हिम अङ्गार

रा. अ. काळेले
राजकवि, इन्दूर

जानेवारी १९५५

मूल्य साडेतीन रुपये

प्रकाशक
ग. अ. काळेले
३६ तुमारी कॉलनी
इन्दूर.

मुद्रक
व. शं. भोसले,
लोकसेवक प्रेस,
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

कृतज्ञता

श्री शहाजी राजे छत्रपति करवीर

यांच्या निर्व्याज काव्यप्रेमामुळें आणि उदार साह्यामुळेंच हा ग्रन्थ प्रकाशांत येत आहे. या प्रेमळ औदार्याबद्दल मी श्रीमच्छत्रपतींचा सदैव कृतज्ञ आहे.

— रा. अ. काळेले



अथाङ्ग ही माझ्या
हृदयाची वापी
गाणे ना किमपि
खोल तळ

जिथे भावनेचे
फुटती पाझर
भरते गम्भीर
गीत तोय

उत्स्फूर्त शब्दांची
लागली ही मोट
कवनांचे लोट
ओतीतसे

रा. शि. काळेले

❀ या पुस्तकाचें मुद्रण उत्कृष्ट व्हावें म्हणून श्री. शं. ब. भोसले राजकवि कोल्हापूर यांनी फार परिश्रम घेतले, आणि फारच थोड्या अवधींत तें काम उत्तमरीतीनें पुरें केलें.

❀ इन्दूरचे कलावन्त श्री. राजाभाऊ बेदरकर यांनी मोठ्या आपुलकीनें पुस्तकाच्या वेष्टनावरील ब्लॉक्साठीं सुन्दर चित्र तयार करून दिलें आणि आपल्या देखरेखीखालीं दक्षतेनें ब्लॉकचें उत्कृष्ट मुद्रण करविलें.

❀ या निर्व्याज मित्रप्रेमाबद्दल मी राजकवि शं. ब. भोसले आणि श्री. राजाभाऊ बेदरकर यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

— रा. अ. काळेले

– कवितांचा अनुक्रम –

तुझ्या पुढें—

तुझ्यापुढें जीवितेश्वरा रे करीतसे मी विनम्र माथा
मदीय पेरून बीं, फळाला
मला तुवां आणिलें कृपाळा
समृद्धि, साफल्य, पूर्णता हीं तुवां दिलीं—तूं प्रसाददाता

मुलापरी पोशिलेंस मातें
अतूट हें जोडलेंस नातें
कसा तुझा स्नेह सांग वानूं ? मला भला तूं पिता नि माता

जुमानिलें नाहिं शीत ऊन्ह
न जाणिली भूक कीं तहान
उपेक्षुनी जीव आपला तूं मदर्थ रे कष्टलास ताता

भरून आतां टपोर दाणे
कणीस मी लोंबलें तयानें
सळाळती ही सुवर्णपातीं सकाळवारा जरा वहातां

तुझ्यापुढें वांकवून मान
अखेर हें मागणार दान
उगार तूझा विळा - पडूं दे पुढ्यांत तूझ्याच शीर आतां !

इन्दूर, नोवेम्बर १९४३

ठाकली तूं पाठमोरी

ठाकली तूं पाठमोरी
लीलया दारासमोरी
पाहतां मागूनही कां नोळखावें मी किशोरी ?

ऐट तुझी बोलण्याची
अन्य कोणा साधण्याची ?
बोलतांना हालतीं कानांतलीं मोतीं टपोरीं

मान हंसाची कमान
तीवरी नागासमान–
शेपटा ये लाम्ब, जो लाम्बून माझें चित्त चोरी

हो खुला खान्दा सुरेख
अन् कटीला हात एक
चान्दणीशी चम्चमे ती बांगडी तूझी बिलोरी

तो तनूचा झोक ! वा वा !
नाचवीतां पाय डावा
ये उठोनी एक मागें टांच ती ताम्बूस गोरी

बोलवूं का ? हांक मारूं ?
छे ! धजेना जीव भीरू
सुन्दरे ! मी प्रार्थितां होशील का तूं पाठमोरी ?

इन्दूर, ३ नोवेम्बर १९४३

अ न्ना सा ठीं

अन्नासाठीं दिशा दाही भटकून अखेर तो
भुकाच पडला आतां थकून धरणीवर

सम्पन्न मायभू त्याची सुफला सस्यश्यामला
रस्त्यांत मरतो आहे भुकेनें पुत्र हो तिचा !

अन्नान्न करतो आहे – झाला आठवडा पुरा
नाहीं पोटामधें गेला अन्नाचा लेशही मुळीं

आतां थण्डावलीं गात्रें, थाम्बली हालचालही
उगाच वळती डोळे जात्यायेत्याकडे असे

कोण हो बघतो त्याला ? जो तो गर्दीत आपल्या
लाम्बून बघती सारे, येईना जवळी कुणी

टाकिलें लोटिलें ज्याला माणसांनी उपेक्षुनी
त्याला चिकटल्या माशा! (आली त्यांना दयाच का ?)

झाला आठवडा एक – लोटला दुसरा वरी
भुका तो जागच्याजागीं मरून पडला अतां

प्रेत बेवारशी आहे पडलें जेथल्या तिथें
उचलावें कुणी त्याला सांगा, कोण शिवे तया ?

देवालाच दया येतां शेवटीं बन्धु भेटला
रात्रीस प्रेत कोल्हयानें तें नेलें उचलोनिया !

"धन्य धन्य", म्हणे कोल्हा, "भुकेनें मरता न हा
यथेच्छ तर हें खाया कोठून मिळतें मला ? "

[illegible]पूर, नोवेम्बर १९४३

आरम्भ होवोनि वसन्तकाला

आरम्भ होवोनि वसन्तकाला
मोहोर आम्ब्यास भरून आला
भर्गच्च ओहो फुलला कसा हा
हा वृक्ष हो शुभ्रच कीं अहाहा !

या मोहरें लोचन फार धाले
निश्वास याचे सुरभीं निघाले
गमे मधुश्री स्वकरेंचि साचीं
प्रसादचिन्हें लिहितें उद्यांचीं

फान्दीस फान्दीस दळादळा हें
साफल्य साकारुन येत आहे
कणोकणीं आस फुलास आली
फुलोफुलीं आस उमाप झाली

– परन्तु – येईल तुफान वारा
मोकाट माण्डील अनर्थ सारा
झोम्बेल, झोडील, करील नाश
झडून मोहोर पडेल रास

वातोठ खाईल तशांत हींव
छे छे, न कांहीं करणार कींव
देईल जोरांत असा तडाखा !
त्यांतून वांचेल बहार हा का ?

येतील मध्यें अवचीत गारा
कठोर ऐसा करितील मारा
करील त्यांची बरसात हानी
पडेल – पाडील फळें लहानीं

येतील पक्षी गगनामधील
अन् घाव मर्मावर घालतील
टोंचून ती खोंचक चोंच फार
छेदील, भेदील, करील ठार !

फळें अखेरीं उरतील थोडीं
अत्यल्प कांहीं धरितील गोडी
इच्छा गड्या, ऊंक जरी जिवाच्या
थोड्याच त्यांतून फळावयाच्या !

बद्नूर, १३ फेब्रुवारी १९४४

स्मि तां चा ला घ वी छा या

स्मिताची लाघवी छाया तुझ्या ओठीं
परन्तु लोचनीं ज्वाला दिसे मोठी

सलोख्याचे सख्या हे बोलसी बोल
परी सुव्यक्त हो ईर्ष्याच जी खोल

कळें, कीं योग मित्रांचा न हा आहे
कळें-पोलाद पोलादास हे बाहे

कळें मातें तुझ्या जो अंतरीं पीळ
कळें, कीं तूं प्रहाराया उतावीळ

अरे-संङ्कोच कचा ? सोड ही लीला
खुल्यानें हात घालूं ये कट्यारीला !

पुरूं दे लालसा जी तीव्र अत्यन्त
धरावा धीर आतां कोठपर्यन्त

गड्या ! ये !-दूरता शोभे न बन्धूंस
मिठी मारूं !-जसे कीं सापमुङ्गूस !

इन्दूर, १२ मे १९४४

हे जुने जोडे

हे जुने जोडे !
कैक दिवस यांना घातले
आतां मात्र हें नाहीं ऐकणार नाहीं राहाणार
जाणार जाणार
मोकळे होणार

गेलीच ही टांच
बन्दांनीं बन्धन दिलें झुगारून
तोंड उघडून ही शिवण कांही करी गुप्तभेद
खालून खिळ्यांचे
चावती दांत
त्यांना आली चीड

या जोड्यांनी आतां
पुकारली आहे
असहकारिता !

यांच्या मेलेल्या कातड्यालासुद्धां
झाली आहे का
निराळी जाणीव ?

इन्दूर, जून १९४४

कां फुगले गाल

विसायचे हसरे असे ते कां फुगले गाल ?
रोष मघांचा तो बसे का टिकून चिरकाल ?
रागावलों, रुसलों बैसलों दूरहि लवलाहीं
पण झटकन् आला राग तो चटकन् जावाही !
वावळ खळबळलें भराभर मेघ भरुन आले
क्षणांत विरलेही ! पुन्हां हें निरभ्र नभ झालें
पूर पावसाळी करी जो गढूळ जळरङ्गा
परन्तु निवळोनी पुन्हाही प्रसन्न हो गङ्गा
असे मघां आला गडे, तो मघांचाच राग
कसा टिकावा तो सदाचा असून अनुराग ?
सोडुन हा रुसवा एकदां हास गडे हास !
अन् वेहीं गेहीं भरूं दे फिरून उल्हास !

इन्दूर, ८ जून १९४४

थेम्ब आषाढाचे आले

थेम्ब आषाढाचे आले
जग जीवनानें न्हालें
उन्मळले सप्तरङ्ग
उचम्बळें अन्तरङ्ग
आलें चैतन्य भरून
शिडशिडलें वरून
वर्षे जीवननिष्यन्द
स्फुरे प्राणपरिस्पन्द
जग सन्जीवन प्यालें
थेम्ब आषाढाचे आले

आलें जीवरसायन
झाली बीजरुजवण
कणाकणांत सकळा
उताटली जीवकळा
काळा कातळ फोडून
आलें फुटोनिया तृण
जीवसत्त्व भरा आलें
थेम्ब आषाढाचे आले

फुटे फान्दीला धुमार
आला वेलीला उभार
पानोपानीं रङ्ग आला

आला कळपांना उमाळा
आशा तरारली जरा
नवी उमेद ये भरा
जीव जीवनानें धाले
थेम्ब आषाढाचे आले !

इन्दूर, १२ जून १९४४

अ रे को हि नू रा

अरे कोहिनूरा !
पुरे रे तुझी ऐट !
मोठ्या दिमाखांत होसी शिरोरूढ
राजेश्वराच्या
असे एक दाणा असो मी गरीबींत
येथें पडूं दे मला–
खोल मातींत

राही गड्या तूं तुझ्या वैभवीं–मात्र–
आहे तुझी जात रे फत्तराची !

पहा गूढ हुङ्कार माझ्यामधें
या विराट् जीवनाचा
अनन्तप्रसू मी !
भविष्यास मीं–मीच देईन–
साफल्य सौभाग्य सर्वस्व

इन्दूर, ८ जुलै १९५४

प्र ती ति

जाणतो रे जाणतो थोरी तुझी ती सत्त्वशाली
दृप्त या माझ्या भुजांना कीं हराया जी न आली

शस्त्रधारी मी उभा—तूं रिक्त ऐसा ठाकलेला
रे तुझ्या हातीं परन्तू शस्त्र तें व्हावें कशाला ?

तीव्र जी दृष्टी तुझी खड्गाहुनी ती भीतिकारी
धीर जो मोठा तुझा, पोलाद का त्याहून भारी ?

आगळें काठिन्य दावी ओठ जो हा घट्ट राही
अन् मुखच्छायेंत राहे शान्तता दुर्धर्षताही

होय विद्युत्पात माझा—शैल तूं तो झेलणारा
भङ्गलें पातें नि ही बोथून गेली खड्गधारा

घातला मी घाव जो तूझ्या उरीं तो बैसलाचि
हें कळें सङ्गेंच कीं छाती खरी ती कातळाची

विन्धिलें वीरा तुला—शस्त्रांत माझी जीत झाली
रे परन्तू अन्तरीं कांहीं प्रतीती हो निराळी !

इन्दूर, २ आगस्ट १९४४

ओ ह ळा स

ओहळा, कशास तरतरसी ?

श्रावण सर ये कुठुन जराशी
तेवढ्यांत तूं भरून जासी
फुलफुलसी, फुरकटसी, फुगसी, चढसी चटसरशी !

चढे तुला उन्मादी पूर
आणि जाय पालटुनी नूर
वाहत वेगें मगरूरपणें कशास गुरगुरसी ?

मेघराज हा खुशींत आला
कृपावन्त तो तुजवर झाला
अन् घटकाभर तुझी ओहळा चङ्गळ होय कशी

परी समज कीं मेघकृपा ही
तुझा नसे पुरुषार्थ जराही
तुझी न थोरी, तुला कशाला व्हावी ऐट तशी ?

या मेघांची ढळतां सत्ता
तूंही पडशिल रे मदमत्ता
बघतां बघतां नुरेल कांहीं तुझी मिजास अशी

ऊर करुन मग सताड उघडें
भिरभिर बघशिल वर नभाकडे
पडुन राहशिल दीन बापडा—कोण पुसे तुजसी ?

इन्दूर, ४ आगस्ट १९४४

उसळली लाट्

वेगांत कशी झुन्जाट् उसळली लाट् !
तिज जराभरी थोपून धराया शक्त कुणाचा हात् ?

हा उफाळता आवेश
जणुं फणा काढि वर शेष
डवचलें तया कुणि म्हणुन करी जणुं रागानें फुम्फाट्

ही अजस्त्र उठली लाट
भिडलीच नभाला थेट
चिरसुप्त अहो हा अतां जनार्दन जागृत होय विराट्

हो सुखासीन ! साम्भाळा
उद्दाम लोट हा आला !
साम्भाळा ! आली धावुन ही वर्धिष्णु शक्ति साक्षात् !

देऊन एक फटकारा
उलथील उभ्या संसारा
मावेक कडाडुन लोकविलक्षण कांहीं करिल अचाट् !

इन्दूर, १० नोवेम्बर १९४४

भडकूं दे ज्वाला

झोक झोक इन्धनास
        भडकूं दे ज्वाला !

उन्च उन्च आँच विकट
भिडुं दे गगनास निकट
धग लागुन करपूं दे
        ही ज्योतिर्माला

या लक्षावधि उरांत
जो धुमसे आंत आंत
तो बुभुक्षु हो हुताश
        तृप्त करी त्याला

मृण्मय हें आसमन्त
करि चिन्मय रे ज्वलन्त
करुं दे रे थैथयाट
        त्या महानळाला

पेटुन धगधग भवाण्ड
उजळूं दे दिन अकाण्ड
आस्वर्गात् फडकूं दे
        दीप्तिच्या ध्वजाला !

इन्दूर, २१ फेब्रुवारी १९४५

स्वैर पवन तूं

स्वैर पवन तूं गड्या सदागति
मी निगडित तरु, रे अगतिक अति

खोल मुळें मज धरिती जखडुन
गतिवन्ता, तुज खुलेंच त्रिभुवन
वाहत येसी नकळत कोठुन
सहज मिळे मज तव लव सङ्गति

प्रेरक घडतां स्पर्श मला तव
उठल्या लहरी सळसळ नवनव
कम्पित शाखा, विचलित पल्लव
अस्थिर हो तनु वर ओढे किति !

स्वैराचें मज लागें वारें
अतां बन्धनीं राहुं कसा रे
म्हणुन बाहतो तुज निर्धारें
ये ! शिवताण्डवसोदर कर कृति !

कळे मला तव तुफान ताकत
भुवनभीम तूं ये सोसाटत
निबिड बन्ध हे तोड तटातट
ही सुटकेची निकट अमृतघटि !

एकदांचि अनिरुद्धपणाची-

स्वच्छन्दाची- खुलेपणाची-

मुक्तपणाची- स्वातन्त्र्याची

अननुभूत मज अनुभवुं दे रति !

इन्दूर, ३० जुलै १९४५

खुपस खोल तव पातें

हलधरा, खुपस रे खुपस खोल तव पातें
हा पहा उघडतो ऊर आत्मदानातें

दरकार कशाची ? ही आर्ताची छाती !
रे जिता कणन् कण ! समजलास का माती ?

चालव रे नाङ्गर, पोखर मम हृदयाला
करि चुराच रे, करि विदीर्ण शतधा त्याला

या विद्ध उरावर संजीवन शिम्पाया
धावेल लगबगा गगनांतिल घनमाया

मम विकल तनूच्या चिराचिरांतुन साचे
नवलाख उगवतिल अङ्कुर चैतन्याचे

बलवन्ता, तव बळ असो बिचारें कांहीं
हें आत्मदान, जें जिङ्किल जेत्यालाही !

हें आत्मदान रे गड्या ठेव ध्यानांत
हें बळ न बळाचें – ही दुबळ्याची मात !

इन्दूर, १३ ऑगस्ट १९४५

अपुली प्रीती पलिकडली

पुनवेच्या रजनींत न रमतों
नदीकिनारीं नच गुजगुजतों
परी जिवलगे, अपुली प्रीती याच्या पलिकडली
अपुली प्रीती पलिकडली !

गुलाब कुठले, कुठलीं कमळें !
परि जीवन हें मधुमय बनलें
कारण सखये, अपुली प्रीती याच्या पलिकडली
अपुली प्रीती पलिकडली !

कविवर्णित प्रेमाचे खेळ
संसाराशीं धरिति न मेळ
पण त्याविण सुंळ उणी न अपुली प्रीती पलिकडली
अपुली प्रीती पलिकडली !

तूं घरकामीं, मी धन्द्यांत
धड न बोललों किति दिवसांत
परि जडली-नच अडली-अपुली प्रीती पलिकडली
अपुली प्रीती पलिकडली !

बहुरीतीं ती वरी न दिसली
तरी अन्तरीं पुरती ठसली
बहिली अपुली प्रीती असली सगळ्यांपलिकडली !
अपुली प्रीती पलिकडली !

जलदांवरि ? कीं नक्षत्रांवरि ?
कीं त्यावरल्या आभाळावरि ?
छे छे–अपुली प्रीती सगळ्या–सगळ्या पलिकडली
अपुली प्रीती पलिकडली !

इन्दूर, २८ आगस्ट १९४५

तुझ्या निसासावाचून

तुझ्या निसासावाचून
वास न ये गुलाबाला
तुझ्या नजरेवाचून
कान्त नाहीं कमळाला

रूपावाचोनिया तुझ्या
नाहीं चटक चान्दणी
तुझ्या बोलावाचून गे
कैची साळुङ्की साजणी ?

ओठावाचोनिया तुझ्या
द्राक्ष नव्हेच मधाळ
प्रीतीवाचून ग तुझ्या
कुठें गहिरें आभाळ ?

तुझ्या हासण्यावाचून
नाहीं झळाळ उन्हाला
तुझ्या तुझ्याच साङ्गातीं
शोध सुखाचा लागला !

इन्दूर, २१ सप्टेम्बर १९४५

घे सखया

घे सखया, हातांत तुझ्या मी देतों ही फुलबाजी
पडता पाउस नवलफुलांचा पाहुन होशिल राजी
फुरफुर नाचत निखळत करिती लखलखती बरसात
फुलेंच हीं-पण आहे यांची फार निराळी जात !
अङ्गावर नच नटवायाचीं शृङ्गाराच्या कामीं
नव्हत फुलें हीं मृदुलमृदुल जीं भोगूं ऐषारामीं
आन्दोळत हिन्दोळत लहरत नाहिं गड्या फुललेलीं
उन्मादकशी सुरभिमधुरता यांत नसे भरलेली
बकुलमालतीपरी न यांची मन्दसुशीतल छाया
सुखस्पर्श देईल अशी नच सुललित कोमल काया
न्यारींच फुलें ! नव्हत निपजलीं पोकळ मातींतून
न्यारींच फुलें ! नाहिं पोसलीं हीं हिमसेक करून
समजुं नको कमअस्सल यांना—आगळींच हीं फार
तपनदीप्तिपरि तळपतात कशि! दिपून जाशिल पार
गुलगुलीतशा गोडगोड या नव्हत गुदगुल्या कांहीं
बण्डखोर या व्यथित जिवाचे हे तर चटके पाही
कानसून खर्खरा काढले कणकण लोखण्डाचे
अचिसवें हे फुटून उडती स्फुलिङ्ग केवळ त्यांचे
हीं ठिणग्यांचीं फुलें गड्या रे जळजळीत तेजाळ
उगिच खेळतां होइल भलतें म्हणुन जरा साम्भाळ !

इन्दूर, २७ सप्टेम्बर १९४५

अमर्याद त्या क्षितिजावरती

अमर्याद त्या क्षितिजावरती
स्फुरतीं माझीं गाणीं सुन्दर
जिथुन पाखरें रिघतीं झर्झर
पङ्खांच्या स्वच्छन्दा वरितीं

जेथुन वरती अलङ्ग उठती
फुगीर गहिरे नवे निळे ढग
ज्यांच्याभवतीं किनार झगमग
देवांचीं जणुं विमानेंच तीं

जिथें होतसे तिमिराचा लय
उदय पावती असङ्ख्य तारक
उगवति दिनरजनीचे कारक
जिथुन फाकतीं किरणें द्युतिमय

जिथुन जागृती ये विश्वातें
नव दिवसा ये नवा हुरूप
भवितव्याची उज्वलरूप
जेथुन आशा जगास वाटे

जिथें एकरङ्गांत मिसळते
रङ्गविविधता नैकविधांची
अमेळ टोकें समान्तरांचीं
जाउन करिती मिलाफ जेथें

चर्मचक्षु हें जेथुन परतें
सत्य लीन हो आभासांत

सान्त, जड जिथें होय समाप्त
अनन्त अद्भुत त्याच्यापरतें

जिथें टेकते नवलकमान
उज्वल नवरङ्गांची सुन्दर
जिथें रेखिते सन्ध्या नवथर
गोड गुलाबी स्वप्नें छान

जिथें स्वैरता मुक्त अनन्तर
नच परिसीमा, नाहि परिमिती
अमर्याद त्या क्षितिजावरती
स्फुरतीं माझीं गाणीं सुन्दर !

इन्दूर, १६ फेब्रुवारी १९४६

कुणी कुठून बान्धलें

कुणी कुठून बान्धलें
वळून प्रेमदोर हा ?
कसें तुलामला अहा
जिवांत एक सान्धलें ?

जुळून सान्त मी नि तूं
अनन्त होय आगळें
क्षणांत एक जागलें
कुणास केंवि तें कथूं ?

मनोमनीं निनादलें
परस्परांत नान्दलें
अगाध कांहि साधलें
जिवास तेंच बाधलें

इन्दूर, २५ मार्च १९४६

अन्नदान

कोणी कोटयाधीश
दयाळू उदार
करी अन्नदान
गरीबांना घाली
इच्छाभोजन

रस्त्यांत बसल्या भुकाळ पङ्गती
त्यांना पोटभर जेवण म्हणजे वाटली पर्वणी !
अपूर्व योग-आणि-(अक्षरशः) अद्वितीयसुद्धां ?

कङ्गाल ते जन्तू
अहा रे कुत्र्याच्या हिरीरीनें कसे तुटून पडले
अन्नकणांवर !
अरेरे,
माणसाच्या दुनियेंतील का माणसें हीं ?

त्या दानशूरा मिळे दुवा
हन्त रे
कोणीच का शाप नाहीं दिला त्याला–
जो बने स्वतः एक नारायण
रंकांची बनवून नरश्वानें ?

इन्दूर, जून १९४६

आला महापूर

आला महापूर ! धो धो-आला महापूर् !
आली पूर्तीची पर्वणी !
नका राहूं रिक्त कोणी !
ओसण्डली जळपूर्णा ! वाहा पूरेपूर् !

उंच नाहीं, निंच नाहीं
जलमय सारें कांहीं
झोल, उथळ सकळ भरलें भर्पूर् !

दोन्ही तट सामावले
मधें अन्तर फिटलें !
एकजीव समतत्त्व झालें महामूर्

एक दिशा, एक ओढ
एक धांव, एक झोड,
एकतान सोसाटयाचा घुमे एकसूर् !

वहावले महावृक्ष !
उले धरणीचें वक्ष !
दगडाच्या धरणाचा काय हो मग्दूर् ?

या रे नदांनो, नद्यांनो !
या रे साऱ्या ओहळांनो !
फोफावून जाऊं ! आतां सागर ना दूर !

इन्दूर, २१ आगस्ट १९४६

ध्वजा तव मर्म समजलें

ध्वजा, तव मर्म समजलें मसी !
तूं मोठा, तूं सगळ्यांवरती
तुझ्यापुढें जन लवतीझुकती
अस्मानाशीं करिसी गोष्टी
महती वर्णूं कशी ?

वर्चस्व तुझें सर्व ठिकाणीं
तूं दरबारीं, शिखरस्थानीं
बुरुजावर, कळसावर बसुनी
डौलानें डोलसी

जिथें तिथें तुज आधीं बढती
तूं सगळ्यांच्या पुढतीं पुढतीं
तुलाच अग्रस्थानीं मिरविति
दिमाखांत चालसी

तूंच चिन्ह विजयाचें छान
तूं अधिराजांचा अभिमान
तूं प्रभुसत्तेचें उपमान
तव जयजय दर्शविसी

कितीक आले-कितीक गेले
कितीक चढले, कितीक पडले
ध्वजा, स्यान तव कधीं न चुकलें
अढळपदीं राहसी

ध्वजा, असति तूं केवळ फडकें
परी तेंच तव वैभव फडके
सखया रे मी वळखे वळखे
गुप्तसिद्धि ही कशी !

सेवाधर्म कळे रे तुजसी
तोच छान तूं नित आचरिसी
चतुरा रे—तूं पाठ फिरविसी
वारा वाहिल तशी !

इन्दूर, २१ आगस्ट १९४६

कुठल्याशा इवल्याच रे फुला

कुठल्याशा इवल्याच रे फुला !
कां पडला रानांत एकला ?
दिसते ही तव चर्या म्लान
कां बसला तूं घालुन मान ?

तुला पाहुनी कोण सुखावे ?
तुझ्यावरी मन कां लोभावें ?
रुप न, रङ्ग न, वास न तुजला
विजनवास तुज म्हणून रुचला ?

तूं अज्ञात अनामिक फूल
कुठुन असावा तुजला डौल ?
जगीं रसिक तुज कोणि न भेटे
म्हणुन वास आवडला येथें ?

गुलाब, चम्पक, बकुळी, कुन्द
शुभ्र मोगरा, मधु निशिगन्ध
लोकीं भूषण मिरविति गाजुन
तूं लपला का त्यांना लाजुन ?

सुन्दर सुन्दर असतील फुलें
भुलोत त्यांना रसिक कुणि भले
ती चिन्ता तुज नको नकोच
फुल रे फुल तूं निस्सङ्कोच !

हर्षानें, गुङ्गावें, गावें
स्वानन्दीं केवळ रङ्गावें
डोलावें, नाचावें नाचा
हक्क असे हा प्रत्येकाचा

मोठे तुम्ही भले सुसंस्कृत,
नच अवमाना गणून प्राकृत
मानव तुम्ही मानव तोही
सहृदय तुम्ही, हृदय त्यासही

ध्वज शिखरावर भुईवर चारा
उभयां डोलवि एकच वारा
चिवचिव चिमणी, कोकिळ मृदुवच
परन्तु त्यांची स्फूर्ती एकच !

प्रचण्ड नद, इवलासा ओढा
सारखेंच जळ, समान ओढा
विशाल जलदीं, इवल्याशा दंवि
रङ्ग जो भरी अनन्य तो रवि

कुणि मोठा वा असेल छोटा
एकच अन्तरिं हर्ष चखोटा
कां बघतां उपरील उपाधी
आंत काय तें वळखा आधीं

हृदयभाव तो नेणुन साचा
करतां हो उपहास कशाचा ?
गड्या फुला, तर डुल डुल रङ्गें
डुलेन मीही तुझिया सङ्गें !

राळ्ळ, २४ आगस्ट १९४६

कृष्णमेघ लागले पुसूं

अतां उदास कृष्णमेघ लागले पुसूं
पुन्हां वरी निळेंनिळेंच लागलें वसूं

कशीं खुशींत जोमदार ठाकलीं पिकें
उदार धन्य क्षेत्रभूमि होइ कामसू

बहूंकडेच गर्दल्या प्रसन्न हिर्वळी
फुले कशी खुले कशी भुई तसूतसू

तशांत कोवळीं सुदूर रेङ्गलीं उन्हें
जणूं खुशाल मातृ-अंङ्कि खेळतें शिशू

अतां हळू हळूं अशीच सान्जतां घडी
विलोल स्वप्नवत् समन्त लागलें दिसूं

इथेंच ये बसूं सखे, जराभरी हसूं
उगीच कां रुसूं बरें ? उद्यां असूं-नसूं !

इन्दूर-मानपूर रस्ता
१३ सप्टेम्बर १९४६

अमुचें तुमचें

अमुचें नभ कृष्ण, निळें तुमचें
तुमचें मधु, कण्टक हे अमुचे
तुमचें रिझणें, निजणें शयनीं
झिजणें, भिजणें, थिजणें अमुचें

जगभार शिरीं, वळ पाठिवरी
क्रमणें पथ दुक्रम दूरवरी
तनु रेटित रेटित जात असे
चढणें चढणीवर हें अमुचें

अमुचें श्रमबिन्दु, अपेश भलें
अमुचें भररक्तहि घाव खुले
भरपोट मुखीं नच घास जरी
तरि पोटभरी हसणें अमुचें

नयनें निज झांकुन अश्रुमुचें
पडले तिमिरांत निमूटवचें
नच ज्यांस कुणी म्हटलें अमुचे
जन ते अमुचे—धन तें अमुचें!

इन्दूर १६ सप्टेम्बर १९४१

मला आवडे

मला आवडे हरित तृणावर दण्डापरि पडणें
तळहातीं शिर टेकुन टकटक आभाळीं बघणें

मला आवडे न्याहाळाया घारीच्या घिरट्या
पङ्ख तोलुनी गरगर वरती सन्थपणें फिरत्या

मला आवडे रमत फिरत्या अफाट एकान्तीं
वाऱ्याच्या दर्यावर तरत्या मेघासाङ्गातीं

मला आवडे उचलजागत्या असङ्ख्य ज्या तारा
टेहळणें विस्त्रब्ध तयांच्या निशीथसन्चारा

मला आवडे सताड उघड्या डोळ्यांच्या कानीं
कांहि ऐकणें जें गुजगुजते ही चन्दाराणी

मला आवडे दृष्टि रोखणें उन्च उन्च वरती
न पोचतां जेथुनिया व्हावी कल्पनाहि परती

मला आवडे भिरभिर बघणें हुडकित वर कांहीं
शून्य शब्दविषयांत दडुन जें शब्दशून्य राही

इन्दूर, १६ फेब्रुवारी १९४७

आ म च्या का ळां त

आमच्या काळांत–

आपत्ती, विपत्ती
हाल, हलाखी
दुष्काळ, दैन्य
उपासमार

आमच्या काळांत–

विध्वंस, विप्लव
उच्छाद, उत्पात
हिंस्त्र हत्या
रक्तखाण्ड

आमच्या काळांत–

अशान्ति
उलटापालट, उलथापालथ

आमच्या काळांत–

प्रलय, विलय
सर्वस्व आहुति!

आमच्या काळांत– धन्य काळांत–

घडलें जात आहे
उद्याचें रामराज्य!

इन्दूर, १७ मार्च १९४७

मो ल क र णी चा पो र

मोलकरणीचा पोर हा बिचारा
त्यास बाजूला सापडे निवारा
जिथें भाण्डीं घाशीत बसे माय
तिथें त्यानें ताणून दिले पाय

शैशवांतिल बाळकी श्यामकांत
हन्त, उघडी क्षुत्क्षुण्ण तनू क्लान्त
अहो अंमळ आडवा जों न झाला
तोंच बाबा ! लागला घोरण्याला

गैरसोयीच्या कोपऱ्यांत तेथें
सर्व सोयी आराम त्यास भेटे
क्लेश आणी आयास दिनभराचे
तेच निद्रासुख त्यास देति साचें

नाद भाण्ड्यांचा होइ घासतांना
त्यास अङ्गाईगीत तेंच माना
चिऱ्यावरतीं टेकली असे डोई
तोच त्याला मउमऊ उशी होई

भुईवर हो पहुडला खडबडीत
नरम गादी ती होय गुबगुबीत
रातवाऱ्याचा शीतळ जो चाळा
तोच कुरवाळा होय तया बाळा

जिथें मानव पुरवी न दयाछाया
तिथें पाखर करि मृदु निसर्गमाया
क्षुद्र चिन्ता हो क्षुद्रमानवाची
धन्य करुणा महनीय निसर्गाची !

[illegible]र, २१ एप्रिल १९४७

त्यांनीं केली चळवळ

गाईपरीस गरीब
तृणापरीस दुर्बळ
त्यांनी केली चळवळ

नाहीं शक्ती, नाहीं युक्ती
नाहीं साधन सामग्री
आहे बिचारा दरिद्री

नाहीं लढाईचा शूर
नाहीं सळाळयाचा खून
अहो एक कारकून !

तोण्ड चिपाडें मलिन
गेल्या खचून उमेदी
आली विशींत सफेदी

आहे कानांवर टाक
काखे दप्तर पघळ
त्यांनी केली चळवळ !

ठावें सरळ हपीस
ठावा कागदी हिशेब
ठावा आपला 'साहेब'

ठावी चाकरी भाकरी
दास दासांचे केवळ
त्यांनी केली चळवळ !

कधीं नुचलला डोळा
छान सम्पावली मर्जी
मग केली कांहीं अर्जी

साम्राज्यशाहीच्या टोल्याचे
बन्दे गुलाम निर्बळ
त्यांनी केली चळवळ !

दीन लाचार बापडे
मान मोडून राबले
किड्यासारखे दाबले

तेच एकत्र जुटले
एका हट्टाला पेटले
आणि सहसा उठले !

दिला दिलांनी जो साद
त्याचा उठला निनाद
पुकारतो 'झिन्दाबाद' !

बने राईचा पर्वत
होई कीटकाचा करी
झाला हरिणाचा हरी !

गेलें दुबळ्यांचें दैन्य
भरे जीर्णांत तारुण्य
स्फुरे प्रेतांत चैतन्य !

झाला एकच निश्चय
गेले चालून पुढती
नाहीं पाहिलें मागुती

त्यांचें करीती स्वागत
बन्दीशाळेच्या चौभिन्ती
घरदार कोण चिन्ती ?

गेला दीस, आठवडा
आला सरायला मास
अरे शाबास शाबास !

कधीं चुके ना, ती चुके
चुके पहिली तारीख
लागे संसाराला भीक

चूल लाकडावांचून
तेलावांचून दिवटी
रितीं रान्जणें पालथीं

रखरखीत दुपारीं
घरीं चिमणीं उपाशीं
कोण धरील पोटाशीं ?

सर्व लाऊन पणास
झाले मोकळे आपण
नाहीं माघारले पण

पददलित धूळ ती
चढे अस्मानावरती
देव कौतुक पाहती !

मुखीं घालोनिया बोट
थबक ठाकले सकळ
अशी केली चळवळ !

[illegible]मूर, जून १९४७

हे नवजलकण

हे नवजलकण श्रावणसुन्दर
हलकें हलकें वरसति सरसर
दिसती पण नच समजति हाता
मात्र फुले अङ्गावर काटा

फुलापरी ही वृष्टि मुलायम
रिमझिम रिमझिम रिमझिम रिमझिम
वाऱ्यावरतीं अलगद पाउल
कुणा न लागो जराहि चाहुल

स्वर्गाचें जणुं भूवर नवतें
न कळत हें हो प्रेमच बसतें
सुरगङ्गेंतिल डुलली कमळें
फडफडलीं कीं नक्षत्रफुलें

पारिजात वा कम्पित वरतीं
ज्यांतुन मधुकण खालीं गळतीं ?
वरसे जल कीं कवनच सरसें ?
पडे वृष्टि, कीं स्वप्न पडतसे ?

गवतावरती पानोपानीं
मोत्यांची गुलजार शिम्पणी
तीच पाकळीवर मखमाली
जणुं सुललित मृदु गोजिरगालीं

भिजलीं रानें, भिजलीं कुरणें
भिजभिजलीं वाऱ्याचीं स्फुरणें
चिबचिब तेजहि झालें ओलें
भिजलें अन्तर, भिजले डोळे

हे नवजलकण श्रावणसुन्दर
हलके हलके वरसति सरसर
वरसतात का हे नवजलकण
कीं चन्चल मधुवयांतले क्षण ?

इन्दूर, २ आगस्ट १९४७

दूरचीं क्षितिजें

लागली आहे ठिब् ठिब् गळती
सारखी
रिप्रिप् रिप्रिप्
रिप्रिप् रिप्रिप्

पुरे झाली
रडतोण्डच्या ढगांची रडकथा !
अश्रूंच्या ओखट चिखलानें
कठीण झाली आमची वाट

उघडूं द्या आतां
निळें आकाश
आमच्या पङ्खांना उठावणारें

पडूं द्या गोमटे किरण
बिन्दूबिन्दूंत
पानापानांवर
तेजाची वात लावणारे

पुसून टाका हीं आन्धळीं बाष्पें
आमच्या दृष्टीला दिसूं द्या
दूरचीं क्षितिजें !

नागपूर, ५ सप्टेंबर १९४७

आपली प्रीत

आपली प्रीत
फुलाची – काटयाची
आपल्या वाटयाची

हरघडीची
तुझ्या चढीची – माझ्या पडीची
तुटीची जुटीची
घट्ट मिठीची

आपली प्रीत
रङ्गारङ्गाची
इन्द्रधनुष्याची
उन पावसाची

मोत्यांच्या सरीची
हास्यलकेरीची
अळीमिळीची – हर्षकळीची
दहिंवराची – गहिंवराची

आपली प्रीत
खऱ्या गोडीची
सारस जोडीची
बिन्तोडीची

व्योमधरतीची
सागरभरतीची
नाहीं परतीची

आपली प्रीत
पाखराच्या तडीची
तडफडीची फडफडीची
उन्च भरारीची

आपली प्रीत

कुणा न कळली
आपणां कळली
शद्बांत चुकती मनांत झुकती
माझ्यांत उलती तुझ्यांत फुलती
हलती झुलती
जुळतीजुळती
खळखळती

अशी गमतीची
आपली प्रीत
भलती भलती–

[illegible], १८ डिसेम्बर १९४७

मा र्ग स र

मार्गसराचं लोभस
ऊन्ह कललं वरतीं
सुखतन्द्रींत बनली
वृत्ति रमती गमती

निळ्या कोपऱ्यांत वर
ढग रेङ्तो वेङ्गतो
धुन्दीमधें उभीं झाडें
वारा चैनीनें वाहातो

शेवतीच्या शेवटाला
अर्धे मिटलेले कळे
गोड स्वप्नांत गढले
जणुं किलकिल डोळे

इथें बसून मजेंत
ऊन घ्यावें पाठीवर
खुसखुशीत उबेनें
आङ्घोळावें घडीभर

उद्योगाचा निरुद्योग
ज्ञानखुळ्यांचें अज्ञान
वाटे तोण्डावाटें वाफ
आणि तरङ्गतें पान!

एका थापेंत करावी
नाव बुद्धीची उपडी
वेड्या कल्पनेसाङ्गातीं
सैर घालावी फुगडी

जड "चक्षुर्वैतत्यां"त
अशी फुङर भरून
त्याचा तरता फुगारा
द्यावा अधान्त्रीं सोडून

धागे वाऱ्याचे धरून
इन्द्रधनुष्य विणावें
दुवे तुटक्या स्वप्नांचें
आगेंमागें जुळवावे

गोड गुजाशीं जोडावा
असम्बन्धाचा सम्बन्ध
लहरीलहरीचा जोडावा
कांहींबाहीं मुक्तच्छन्द

निळया कोपऱ्यांत वर
ढग रेङ्गतो वेङ्गतो
धुन्दीमधें उभीं झाडें
वारा चैनीनें वाहतो

शेवटीच्या शेवटाला
अर्धे मिटलेले कळे
मोल माझिया फोलाचें
त्यांना कळे–मला कळे!!

इन्दुर, २२ डिसेम्बर १९४७

पैल ढगांच्या

पैल ढगांच्या अनन्तामधें करिती फेरी
ज्या विरघळत्या विरत्या चन्चल गानलकेरी
जादूची घालून तयांना गुप्त गवसणी
स्वर्गामधुनी स्वरगङ्गा तूं आणसि भुवनीं

गङ्च्या गूढ सङ्केतच का कांहीसें जुळले ?
कीं भावस्थिर जननान्तरसौहृद आकळलें ?
तुझ्या हृदयकोनांत थरकतां नवथर लहरी
तिथें प्रकटल्या आलापित गन्धर्व किन्नरी

तिथें वाहिल्या सर्वेच मधुतर सरिगम धारा
तिथें झननझन् झङ्कारिति या कन्चनतारा
फुटे कोठुनी भाव रित्याच्या मुक्या जिभेला ?
खळाळ कोठुन ये अज्ञाताच्या प्रतिभेला ?

कोण गातसे ? सूर कोठले ? कुठे उमटले ?
या किमयेनें दूरपणाचें द्वैतच फिटलें !
प्रेमळा, तुझें उललें हललें कोमल अन्तर
आणि विसरलें, सरलें शत मैलांचें अन्तर

इन्दूर, २२ आगस्ट १९४८

जु न्या पु रा ण्यां चा हा वा डा

जुन्यापुराण्यांचा हा वाडा जुनापुराणा झाला
जुन्यापुराण्या इतिहासाला मिळुन जाउं द्या त्याला!

पहाच याच्या अष्टाङ्गाला आला तिरका झोक
खचत्या भिताडास निघाला अशो केवढा पोक!

ताटकळुन या तुळईचें तर मोडलेंच कंबरडें
बिजागरावर दार खरडतां फोडी जणु हंबरडे

जपुन चढा हा जिना—तयाला भरे कांपरें भारी
वाटे यासह कोसळेल ही डुलती दुनिया सारी

या खिडक्यांच्या लालजांभळ्या फुटून गेल्या कांचा
आतां या नुसत्याच राहिल्या जणु डोळ्यांच्या खांचा

भोंकाळ्या भितीला पडलीं भेदक हीं खिंडारें
त्यांतुन शिरतां गुरगुर सुरसुर करितें भिरभिर वारें

पोंचटून साराच गिलावा गळून पडला खालीं
विवर्ण मळक्या विचक विटांतुन लपून बसल्या पाली

पोपड्यास चिकटून राहिला उरलासुरला रङ्ग
या रङ्गानें बेरङ्गाचा अधिकच हो बेढङ्ग

ढासळलेल्या ढिपळांची ही जागोजागीं रास
मोडकळीची, वैराणाची जिथें तिथें आरास

पायापासुन सुटला अगदीं या डोलाचा तोल
काय तयाला शिमिटचुन्याचें डकवण करतां फोल ?

सांभाळुन का धराल? कुठवर आवराल हो याला ?
कवणेंपरि थोपवाल धप्धप् ढळत्या कोसळत्याला ?

दूर सारुनी जीर्णजुन्याच्या मडक्यापडक्या लोभा
या धरतीवर उभारूं चला काहि नवोज्ज्वल शोभा

नवे अम्ही नवनिर्माणाची गाऊं नवी नवलाई
अमुच्या नवसृष्टीला [illegible] सारें कांही

नवसंयोजन, नवरचना ही, [illegible] आकार
नव्या दिशेला सन्मुख करिता [illegible] अमुचा धीर

पराक्रमाला [illegible]नी, [illegible] गुह[illegible]ची कारगी
हातीं घेउन [illegible] कर्तव्य [illegible]ककरणी

जुन्या गुराख्या [illegible] कांही नाद
आम्ही नवनिर्माणाचे [illegible]

इंदूर, २२ मे १९४०

हळूंच माझ्या खिडकींतून

हळूंच माझ्या खिडकींतुन हे चान्दकिरण ठाकले
उशालगत हे आले केव्हां आणि कसे, नाकळे--

धवलचारुता ही रसरमती सरतीसरती पुढ
बघुन हिची चोरटी चातुरी विस्मय चित्तीं पडे

हळूंच शिरली, हळूंच शिवली, हळूंच पडली गळीं
अभिसाराची कला अशी ही कुणी बरें शिकवली ?

प्रथम दूर, नन्तरीं निकट, मग चिकटलीच कीं मला !
खान्द्यावर, गालीं मग ओठीं कले गौरकोमला

किन्चित् माझ्या उशीस शिवली या किरणांची खुशी
त्या स्पर्शानें जड शय्याही पहाच हसली कशी !

या खिडकींतुन शुभ्र छत्रीचा चौकोन असा पडे
कीं नवलाचें प्रेमपत्र हें उघडे माझ्यापुढे ?

रजतपटावर रजतरसानें लिही रजतकामिनी
रजतलेख तो वाचुन झालों दङ्गच अपुल्या मनीं

हळूंच माझ्या खिडकींतुन कां चान्दकिरण ठाकले ?
काय चान्दण्याचा कागद हा पोंचविण्या पातले ?

रतलाम, १४ सप्टेम्बर १९४९

गा प्रतिभे--

गा प्रतिभे गे
गा गा गाणीं

सूर्याच्या अन्तःकोषान्ती
अङ्गाराची लोहित कान्ती
त्याली जाज्वल जी सरस्वती
वे तिची प्रखर तेजोवाणी

गा शुक्राची ज्योतिःसूक्ती
घे उल्केची भरारक्लृप्ती
तारांच्या रचि द्युतिमयपङ्क्ती
नवकविता स्रव झळझळवाणी

सुवर्णकमळांना लाजविती
कौस्तुभ तेजाला फिकटविती
दिवसाच्या डोळ्यास दिपविती--
देदीप्तरुचा भरं दे गानीं

त्या दीप्तीचा पाडुन स्रोत
माझ्या हृदयीं पेटव ज्योत
करि रजनीतिमिराचा स्फोट
गे उघड वैभवाच्या खाणी

क्षीण खोल तीं मिळमिळ गीती
दुबळी मिणमिण पेङ्गुळ पणती
पुरे पुरे ही दरिद्ररीती !
कां भरली अन्धेरी ग्लानी ?

प्रकाशावरी अमुची सत्ता
सूर्य, चन्द्र ही अमुची मत्ता
ऊर्जस्वल महती मानवता
जी या भुवनाची अधिराणी

देवांहुन तेजस्वी कांहीं
हा मानव हो ! त्याची द्वाही
फिरवणार जो दिशांत दाही
कविरवीन्द्र तो उदया आणी !

इंदूर, ४ नोवेम्बर १९४९

अपुरें दर्शन

डोकावुन डोकावुन पाहतें तुला
इकडुन तूं जातांना
तिकडुन कधिं वळतांना
डोकावुन डोकावुन पाहतें तुला

तुज बघतें वळुनवळुन
जाशील कां पळुनपळुन?
नजरेचा ओठ करुन चुम्बुं दे तुला!

पाहिलें न तुज मनभर
रे क्षणभर–रे कणभर
पाहे मी पुसट तुझी गोड मुखकळा

क्षणदर्शन हें अपुरें
पण मजला तेंहि पुरे
एकच कण जेवुन का हरि न तोषला?

इन्दूर, १९४९

लाल सान्ज

लाल सान्ज अन्धारुन आली
रान बसे पिन्जारुन झिन्ज्या
त्यास चिकटली एकच इवली
चिन्धोटी वाटेची मळक्या

बिङ्ग उघडुनी खडकाळाचें
खडवण्टाच्या चौकटीमधें
भिङ्ग जडविलें नदीजळाचें
निर्जनास ही अनास कापी

कोसभराच्या टापूंत अशीं
औडक चौडक करून बसलीं
या दरडाच्या पाठीवरतीं
चार छप्परें – माशाच जशा

तीरकामठें अन् लङ्गोटी
द्विपाद काळें श्वापद कोणी
त्याच्यामागें वाटचाल करि
तशीच त्याची कृष्णमृगी ही

काळाच्या खड्ड्यांत इथें हें
जीवन पडलें चाक मोडुनी
आदिकाळच्या टोकापाशीं
अचलांमध्यें अचल होउनी

राणापूर २ आनेवारी १९५०

हा रिक्शावाला

हा रिक्शावाला स्वतःच बनुनी घोडा
ओढितो; ओढतां कसा थकेना थोडा?

करपला देह हा बाभळखोडावाणी
नखशिखान्त वाहे घामाची ही झरणी

वाऱ्याशीं झगडत करि छातीचा कोट
अन् फुफ्फुसधमनी फुङ्कुन सुकला ओठ

पावलीअधेलिस नेई कोठे कुठुनी
धनतोली, बरडी, महाल आणिक अजनी!

सारखा चढणिचा रस्ता पल्लेदार
ही दुपार रखरख पाखडिते अङ्गार

रेटितां रेटितां यास लागली धाप
हा मानवतेला मिळेच मानवशाप

आरूढ गाडिवर सुखासीन कुणि साचा
गाडीस जुम्पला द्विपाद-भाऊ त्याचा!

जुम्पला अम्ही नर! जो नारायण व्हावा-
तो स्पर्धा करितो अश्वासङ्गें! वा वा!

नागपूर, १५ जून १९५०

तुझी रीत

अशि ग कशि बोलण्याचि तुझि रीत् ?

ओळख अजुनी झाली नाहीं
ओळखलें पण सारें कांही !
अर्थ उताविळ धरुन धिटाई–
शद्बाला करि चीत् !

फुलाविना मधुगन्ध दरवळे
कालविल्याविण एकच उमटले
स्वरावाचुनी सुन्दर भरतें
अवखळ कांही गीत

हृदयाच्या कलशांत घुसळतें,
घुराळत–उसळत आलें वरतें
तेच तुझ्या नजरेवर तरतें–
मधुरमधुर नवनीत्

नच अक्षर उच्चारिसि वाचे
ओठ ठेवसी मिटून साचे,
अशा अकर्मक क्रियापदांचें -
मर्म कळे मज नीट् !

शद्ब बिचारा अडोख अडला,
अर्थ मुखावरती उलगडला
उडत्या पदरावर घडघडला
मला–तुला माहीत्–

इन्दूर, १ सप्टेम्बर १९५०

सुरेल चमेली

माझ्या अङ्गणांतली
सुरेल चमेली
लीलया लटकत लोम्बकाळत
आपलें सुगन्धी गुपित
कोपऱ्याला साङ्गते

आपल्या काप्राच्या फुलांची शुभ्र नव्हाळी
वाऱ्याच्या पदरानें उघडी उधळते
अङ्‌णभर फुलें !
जिकडे तिकडें फुलें !
फुलें ! फुलें ! फुलें !

थोडीशीं फुलें मी ओन्जळींत घेतो
डोळ्यांत भरतो
जिवांत ओढतो

पुष्कळशी फुलें तशींच पडतात
वाळुन जातात
त्यांचा कचरा मी टोपली भरून
फेकून देतो उकिरड्यावर

तरीपण पुन्हां पडतात फुलें
पुन्हां अंङ्गणभर फुलेंच फुलें
पुन्हां फुलें
पुन्हां कचरा
पुन्हा उकिरडा

मला समजेना कीं
ही खुळी चमेली
आपल्या अमोल रूपाचीं बिनमोल फुलें
मातीमोलानें
कुणाला लुटविते ?

आहे का लुब्ध ती –
माझ्या रसिकतेवर ?
– किंवा –
खरोखरच तिचें प्रेम आहे
त्या उकिरड्यावर !

न्दूर, ३ आक्टोबर १९५०

अरे अरे कळसा

" अरे, अरे कळसा
हसून नको पाहूं !
पायरीचा मी दगड
तुझाच कीं भाऊ !"

" मी तर बडा कळस
माझा किरीट झळझळीत!
पायरीचा तूं दगड
पडलास धूळ गिळीत!"

" अरे, अरे कळसा
जरा बघ–जरा तरी!
पायरीचा मी दगड
तुझा भाऊ-गरीब जरी."

" मी उंच कळस !
चढणार आकाशीं !
पायरीचा तूं दगड
पडणार तळाशीं ! "

" अरे, अरे कळसा
नको गाल फुगवून बसूं !
पायरीचा मी दगड
तरी भाऊभाऊ असूं."

"डौलदार मी कळस!
माझा मुकुट कसा छान् !
पायरीचा तूं दगड
तुझा पैजारांचा मान !"

"अरे, अरे कळसा
नको झिडकारूं मला!
भाऊ ना मी तुझा?
माझा दादा तूं भला!"

' कुठे मी कळस!
मला ठेंगणं आभाळ!
पायरीचा तूं दगड!
आपली पायरी साम्भाळ!"

कळसाचा दगड
गर्वानें चढला
पायरीचा दगड
मान घालून बसला

इतक्यांत आला सज्जन
देवदर्शन करीत
पायरीवर बसला
"राम राम" स्मरीत

तितक्यांत आला कावळा
पंख फडकावीत
जाऊन बसला कळसावर
"काव् काव्" करीत

ग्वाल्हेर, २७ आक्टोबर १९५०

उदय घडीची तोफ्

घडकली उदयघडीची तोफ्
अन्धाराचा भगबडला तट?
फुटला काळया पापांचा घट ?
काळोखाचा फत्तर तट्तट—
फोडुन आलें वरतें नवतें नव तेजाचें रोप्

दिशोदिशीं हा ध्वनि आपटला
आकाशातळिं तो आदळला
वाऱ्याच्या उदरांतहि घुसला
काय मुलुखमैदान साङ्गते गरजुन वीरनिरोप्?

मूर्तिमन्त जागृति कडकडली
नजर तारकांची गडबडली
तंद्रीतुन शान्ती खडबडली
बहुरङ्गी स्वप्नाचा तुटला अरधाविणला गोफ्

काय जगाचा मोक्ष धडाडे ?
कीं प्राचीचा विजय कडाडे ?
दिवसाचे का दार खडाडें ?
कीं वञ्चियल्या श्रमाचाच हो हुङ्कारी हा खोफ्?

अन्यायाच्या तिमिरांतुनिया
डुबली दबली दुबळी दुनिया
भग्न अन्तराळांतुन तिचिया—
त्वेषभरानें फुटोनिया का निघे अनावर कोप् ?

या हिवक्यानें वाडे हलले
क्षण झुम्बरलोलक लटलटले
कळस, घुमट अन्तरीं कांपले
विलासशय्या वचकुन बिचकुन उठली ! कुठली झोप ?

ग्वाल्हेर ६ नोवेम्बर १९५०

एक एक गळुन पान

एक एक गळुन पान ओसली डहाळी
ती हिरवी रङ्गकला
मावळली तरुणकळा
शुष्क अवकळाच मलुल लालकपिल आली

नुरलें तें रूप गोड
उरलें हें मात्र खोड
केवळ या काड्यांची उन्च उभी जाळी

गारठली आस विधुर
गोठलेंहि गीत मधुर
जीवनह्रद थिजुन थण्ड बर्फ जमे खालीं

न्याहाळित शून्य नभा
दगडापरि वृक्ष उभा !
वर कशास उगिच तरी दीन नजर घाली ?

ग्वाल्हेर, १८ डिसेम्बर १९५०

एक मुक्त कथा

भिक्कारड्या कुत्रीचीं
भिक्कारडीं पिलें!
रस्त्यावर पडे
वैभव तें खुलें

एकूण नऊ तीं
त्यांत भुरीं चार
एक होतें काळें
बाकी ठिपकेदार

मोठाच व्याप तो !
पण हळूं हळूं
लागलें गळाया
एक एक पिलूं

कोठलीशीं चार
रोगापायीं गेलीं
दोन थण्डीमधें
गारठून मेलीं

एक खटाऱ्यानें
चेङ्गरलें ठार
मोटारीनें एक
उडवलें पार!

राहातां राहिला
एक बच्चा काळा
देव जाणे कसा
चुके मरणाला !

मल्ली नी गटारी
शोधीत हुङ्गीत
मोरीच्या तोण्डांत
तोण्ड खुपशीत

टाकला फेकला
राहिला चुकून
साण्डला पडला
कण झपाटून—

चावीत चघळीत
वाळकींच हाडें
देवदयें काळ्या
हळूं हळूं वाढे

असो नसो अर्थ
अशा जीवनाला
नुक्ती झाली गोष्ट
साङ्गतो तुम्हाला—

रोजच्या ठिकाणीं
वाटेच्या कडेला
होता बघा काळ्या
बरा पडलेला

तिकडून आले
महाशय कोणी
लाडक्या आपल्या
कुत्र्याला घेवोनी

मालकापरी ता
कुत्रा रुबाब्दार्
शुभ्र गुबगुबीत
मोठा ऐटदार्

नव्हें साधें कुत्रें
समर्थाचें श्वान
काळ्याला पाहून
झाला अपमान !

लाण्ड्या शेपटाचा
खुण्ट हालवीत
नाक चढवून
गेला गुर्गुरत

" कां रे भिकारड्या
दिसला समोर ?
भो भो—कां बसला
माझ्या वाटेवर ? "

चपापून काळ्या
दबलाच मागें
कुऱ्यांत कुत्रोबा
पुढारले वेगें

काळ्यावर मग
झडप घालून
विक्रम गाजवी
उन्मत्त तें श्वान

धरी मानगूट
दाबलें नरडें
काळ्या काकुळतीं
आरडे ओरडे

शौर्य तें पाहून
जो तो म्हणे "ओहो !"
राव चीत्कारले
"ब्रेहो ! राजा ब्रेव्हो !"

कसे हो काळ्याचे
चालवले हाल!
गळ्यांतून वाहे
रक्त लाललाल !

सहसा फुटली
प्रक्षोभाची ज्वाला
विजेपरी काळ्या
खाड्कन् उभा झाला !

एका हिसड्यानें
सोडवी स्वतःस
झटक्यासरशीं
लोळवी राजास

मांसल मानेचा
भरला बचका
लोम्बत्या गालाचा
तोडला लचका

कडाडा चावून
सालडें काढलें
वरतीं रक्ताचें
कारन्जें उडालें !

दंष्ट्राच्या मिठींत
पंकडी जखडी
रगड रगड
रगडी–रगडी

रगडी खडींत
रगडी धुळींत
करी चेन्दामेन्दा
गटारमातींत

चौकडे लोकांनी
पुकारला गिल्ला
कोसळे काठ्याचा
कोळ्यावर हल्ला

काळ्या सोडेचिना!
हवेंत उघड्या
मग्रूर गर्वाच्या
उडवी चिन्धड्या

पतित शोणित
धुळीनें धुवून
धरत्ती तीर्थांत
करवी पावन

राजाची नव्हती
भरली घटका
म्हणून कशीशी
झालीच सुटका

राजा कण्हतसे
मऊ गादीवर
मलमपटीचा
चाले उपचार

रस्त्यामधें काळ्या
बसला खुशींत
जखम आपली
चाटीत पुशीत

ग्वाल्हेर, १ मार्च १९५१

शीतळ फुङ्कर

तव शीतळ फुङ्कर घाल मला

ऊन दगड हे ऊनहि वारा
ऊन निथळ घामाच्या धारा
ओढतां दिवस सुकलाच गळा

चार प्रहरभर तापुन तापुन
भगभगीत हा वैशाखी दिन
हळुहळूं अतां नमला शमला

कढतकढतशा माझ्या गाला
तुझा खेळकर शिवुं दे चाळा
सन्तप्त जिवाच्या निवव कळा

हिमचन्दनकर्पूरविलेपन
ढाळ ढाळ तव मन्जुळ विन्झण
स्पर्शुं दे लहर मोहनमृदुला

चुम्बत चाढत अलगत बिलगत
कुरवाळत लागत आलिङ्गत
नाचुं दे वाहती तरल कला

तुझा जराभर एक निसासा
मज अंमळ देईल दिलासा
त्यावीण अहा जिव गुदमरला

इन्दूर ८ जून १९५१

क्षण झांकळती

क्षण झांकळती नव मेघ वरी
क्षण प्रस्फुट नील छबी हसरी
क्षण सूर्य दडे, क्षण ऊन पडे
क्षण येति सरारत पाणसरी

क्षण आडुन सूर्यकटाक्ष उले
क्षण मेघपटावर वीज झुले
क्षण हीं किरणें तिरपीं पडतां
नभि इन्द्रधनुष्य कमान धरी

क्षण नृत्य करी जलबिन्दुमती
क्षण रङ्ग भरी छबि लोभवती
हिरव्या कुरणावर अन्थरती
तिरडा नि कुरण्टक अन् तगरी

क्षण बुद्बुद हे वरती वरती
उठती, फुटती, फिरती, तरती
क्षण मन्थर मेघनिनाद मनीं
भरवी लहरी लहरी लहरी

लहरींत तरू, लहरींत लता
लहरे तृण हें अवतां भवतां
लहरी वळणांवळणांमधुनी
लहरीच जलौघ खळाळ करी

क्षण रोष तुझा, क्षण हर्ष तुझा
क्षण दाविति आर्द्र कपोल मजा
नव नाच करी ऋतु हा लहरी
जशि तूं चपला लहरीबहरी !

इन्दूर, ३० आगस्ट १९५१

जीवनदाता

जीवनदाता ! जीवनदाता !

आला आकाशामाझारीं
मेघ सावळा लोभस भारी
जणूं कनैया कृष्णमुरारी
लोक तोषले तया पहातां

गरिब, भुकेले, व्याकुळले जन
आशाळुन वर वळविति लोचन
म्हणती आला दीनदयाघन
दुःखविमोचक अमुचा त्राता

हा अमुचें दारिद्र्य निवारिल
विपुल धान्यधन आम्हां देइल
सकल मनोरथ अमुचें पुरविल
हालअपेष्टा सरल्या आतां

आतां सुजला नद्या वाहतिल
वनोवनीं निर्झर खळखळतिल
निसर्गकवि स्फूर्तीनें गातिल
उत्कर्षाची सुरेल गाथा

भरेल आतां नवी टवटवी
कुरणें होतिल हिरवींहिरवीं
उभीं राहतिल शेतें बरवीं
होइल सुफला धरतीमाता

ये रे ये रे, येसि नच कसा?
ये मेघा ये आण पावसा
पाव पाव गा, अमुच्या नवसा !
स्वागतार्थ सरसावति हातां

मेघ महासुर काळाकाळा
विकट हसुनि मग धावत आला
पाहुनि त्या कळिकाळहि भ्याला
अक्का करकर चावत दातां !

क्रूर पशूपरि लवळे कडकड
करी रौद्ररव गडगड गडगड
उलथुनि पाडी दिशांस धडधड
उखडी पर्वत, हाणि थपाटा !

फासुन शाई करि अन्धारा
कोसळल्या धो धो धो धारा
लोपुन जाई जग माझारां
प्रचण्ड मोठा स्रोत वहातो

महावृक्ष उन्मळून पडले
कम्पित भूतल भंगुनि गेलें
पाताळाचें नरडें फुटलें
उठल्या वर प्रळयाच्या लाटा

महापुरावरि वाहति नगरें
तरतीं प्रेतें ! बुडालीं गुरें !
जीवनदाता ! हा दैवा रे !
हा तर उठला जीवनघाता !

निर्वासित जन घरावांचुनी-
निरन्न पडले आ वासोनी
सर्वस्वावर फिरतां पाणी
कणडावर आपटती माथा !

इन्दूर, ३ सप्टेम्बर १९५१

या इथें—

या इथें, या इथें फत्तरांत दगडांत
या रुक्ष राङ्गडी खडबडीत खडकांत

या उडत्या फिरत्या अन्धाधुन्द धुळींत
या फटीफटींतुन थिजलेल्या मातींत

या कोळपणाऱ्या रणरण वैशाखांत
या गारठलेल्या कळाहीन माघांत

या जीर्णपुरातन किटल्या अन्धारांत
या सुस्त घरांच्या अजगरविस्तारांत

या रेङ्गत रेङ्गत गमणाऱ्या सृष्टींत
या पेङ्गत पेङ्गत बघणाऱ्या दृष्टींत

या बन्द कवाडांत, अन्ध या खिडक्यांत
कोटांत, लुप्त गोटांत, सुप्त खाटांत

या पाषाणांच्या कोरड्याच हृदयांत
या पहाडांतल्या ठणठणीत गोट्यांत

या इथें–काय हो इथें लोष्टपिण्डांत ?
या इथें–काय हो इथें धुळित दगडांत ?

या इथेंच–या मातीवर टेकुन भाला
या धुळित झांशिची निजली क्रांतिज्वाला

या इथें–हो इथें– या पाषाणवितानीं
या फत्तरांमधें– फुलली ताम्बेराणी !

ग्वाल्हेर ६ नोवेम्बर १९५१

ज शी चा न्द णी आ का शा ला

जशी चान्दणी आकाशाला
तशी लटकली वरतीं चिन्च
पान्नांच्या झुम्बरास लोलक
झाडाच्या शेण्ड्यावर उन्च

आम्बट आम्बट गोड गोड पण
गाभुळल्या त्या चिन्चेसाठीं
कुणि बालक कोटावर चढला
रङ्गदार त्या चिन्चेपाठीं

नाजुक फान्दी, उन्च कोट हा
त्याची उतरे खोल साउली
पाताळाला चाटायाला
लाम्ब जणूं ही जीभ काढली

ही फान्दी विश्वासघातकी
या कोटाचें कपटी हृद्‌गत
परन्तु त्या पोराची दृष्टी
त्या रसाळ केन्द्रावर केन्द्रित

चविष्ट, चन्चल, रुसकर भारी.
चिन्चेनें होऊन आकृष्ट
कठीण कोटावरतीं चढला
कोण बरें हा बालक धृष्ट ?

घणपर्णांच्या आयाळीच्या
सिंहाच्या दाढेंत भयानक
हात घालि हा भरतकुमार
चिन्चेचा उपटाया दंष्ट्र

अहा, कोठच्या कोठें वरतीं
वाऱ्यावर चिन्चेचा इमला!
तया फळास्तव प्रांशुलभ्य पण
हा उद्बाहू वामन इवला!

चिन्चेस्तव धडपडत्या बाळा
धडपडसी तूं, धडपडतो मी,
अति दुर्लभ ऐशा प्रेयास्तव
सारखाच रे अपुला चाळा

रङ्गदार अन् आकर्षकही
शिखराच्या कांहीं चिन्चेस्तव
बुद्धीच्या टोकास उभा मी
ठिसूळ आशेवरी अवास्तव

आकाशावर लाउन दृष्टी
जीभ चाटतो उगीच लम्पट
ती चाळवती चिन्च मिळेना
तोण्ड बरिक हें झालें आम्बट!

ग्वाल्हेर १६ नोवेम्बर १९५१

हा सौन्दर्य कले

हा सौन्दर्यकले ! कुणी तुजवरी आघात केला बरें !
ही शिल्पार्पित सुन्दरा करि शिलाखण्डास या मण्डित
लावण्यप्रतिमाच अप्रतिम हो, केली कशी खण्डित !
हा विध्वंस कटुप्रहार करुनी केला कुणी बर्बरें ?

हा पाषाण न हो, सुहास्यवदना ही बिम्बली ज्यावर
तो पाषाण खरा– जयें स्वहृदयीं हें शिल्पलें शिल्प ना
तो पाषाण– जयास मोह न पडे ही पाहतां मोहना
तो पाषाण– हिच्यावरी उचलला ज्यानें विनाशी कर !

बोले ना, पण गोड हें स्मित अहा ही कोमलाङ्गी करी
ओठांच्या मधुवन्त बङ्किम कशा या फाकल्या पाकळ्या!
या गालांवरतीं फुगीर पडल्या नाजूकशा या खळ्या
झाले खण्ड– तरी अखण्डचि हसे, ही धैर्यमूर्ती खरी !

ध्यातो हें स्मित मी निरन्तर– अतां हाणा कुणी हाणते
नाही शब्द मुखें ! सुखें हसत मी झेलीन आघात ते !

ग्वाल्हेर, २३ जानेवारी १९५२

केश मोकळे

केश मोकळे न्हाउन सुटले
शुभ्र वसन अति शोभुन उठलें

साज पुजेचा हातीं धरला
कोणतरी ही यौवनतरला ?

केशरकुङ्कुम अङ्कित भाळीं
प्रभातकिरणें उजळीं गालीं

ही गौराङ्गीं जाय मन्दिरा
रूपधनाची काय इन्दिरा ?

रमणि, ज्यास तूं पूजिसि भावें
देव तुझा तो मला न ठावे

तुझ्यामधें जो सौन्दर्यात्मा
तोच मला गमला परमात्मा

इन्दूर, १५ सप्टेम्बर १९५२

येतिल कधि मज पङ्ख

येतिल कधि मज पङ्ख ?
उडाया, येतिल कधि मज पङ्ख ?
या आळ्यांसह मी सरपटतों
भुईतळीं केवळ फरपटतों
खितपत खालीं वळवळ करतों
जेथें पडला पङ्क

हें माझें जग, वीतभराचें !
घरकुल माझें चिमुटभराचें।
क्षितिज गोठतें मूठभराचें
त्यांत कीट मी रङ्क!

अहा ! वरी मोकाट हो खुलें
खुल्यावरी नक्षत्र हें खुलें
तिथें खोलुनी पंख आपले
गरुड फिरे निश्शङ्क

तयासवें मम अन्तर उडतां
येई ना मज भुई सोडतां,
चाटित पडलों धूळचि नुसता
हा खुपतो आतङ्क

अफाट दर्शन मजला व्हावें–
जें मर्यादेंत न सामावें
हृदय भरून एकदा पहावें
जीवन खुलें विटङ्क !–

जे चौभिन्तींपैल निरुन्द-
देत फेकुनी छोटे बन्ध-
चहुंकडेच खेळे स्वच्छन्द-
चारुतेंत अकलंक

नव आशांच्या कळचा उमलती
नव्या दिशांचीं तोण्डें खुलतीं
.नवा किरण हा चढतो वरतीं
सेविन त्याचा अङ्क

तिथें हवेवर तरल तराया
नीलिमेंत मनभर डुम्बाया
जलदांचे अन्चल चुम्बाया
हवे हवेचे पङ्ख !
येतिल कधिं मज पङ्ख?

इन्दूर, २४ सप्टेम्बर १९५२

सुफलित वसन्त

सुफलित वसन्त सकळां व्हावा

ताम्बुस हिरवे पल्लव खोंवी
त्यांत मन्जरी नाजुक गोंवी
कोकिळ त्याची गाउन ओंवी
स्तवितो या ऋतुरावा

यानें हो खुलविल्या कळ्या नव
यानें केले कुसुमित पल्लव
यानें दिधला अमृतअनुभव
मधुकर गुन्जति वा वा!

यानें अवनीतल भूषविलें
यानें मनहर रङग सजविले
यानें लोभस फळ लटकविलें
करि पूर्तीचा दावा

वसन्त नयनीं, वसन्त श्रवणीं
वसन्त ओठीं वसन्त वदनीं
वसन्त हृदयीं, वसन्त भुवनीं
तो सकळांनीं गावा

-परी आजच्या या विभवास्तव
याच फुलांस्तव याच फळांस्तव
गिळला ज्यानें जिवन्त विस्तव
केला नच काङ्गावा

यांस्तव ज्यानें दिधलें जीवन
यांस्तव थिजला थण्ड हिमांतुन
तो निदाघ, पर्जन्य, शिशिर,-पण
कोण पुसे त्या नांवा ?

इन्दूर, आक्टोबर १९५२

सरून गेल्यावरतीं मज्लिस

सरून गेल्यावरतीं मज्लिस
वाऱ्यावर विरल्यावर तान
धुन्दीची मोडतां कमान
मस्तीला आल्यावर भान
वेडे पोरी, आतां आलिस ?

जेव्हां खोलुन आंतिल कोश
दिली तुला कमळानें साद
तेव्हां नव्हती तुजला दाद
बन्द तुझा होता प्रासाद
नव्हता तुजला तुझाच होष

सरस्वतीचे निशब्द अलगद
शब्द बाहुलित झाले गोळा
ओठांनी घातलाहि डोळा
परन्तु केवळ चोळामोळा
झाला माझा पतङ्गकागद !

आतां काळवल्या घनकोरी
चंद्र उतरला क्षितिजाआड
रस्ता हा बनला ओसाड
केल्यावर मी बन्द कवाड

आतां आलिस वेडे पोरी !
वेडे पोरी, कशास सजलिस-
सरून गेल्यावरतीं मज्लिस?

[illegible], २७ नोवेम्बर १९५२

कितिक सदनें

कितिक सदनें लोकार्थ तशा शाला
गृहें, पीठें, आलयें, जनहिताला
बघुन गरिबाच्या आस मनीं होय
म्हणे, "माझ्यासाठींच सर्व सोय!"

"सर्व माझें, माझेंच नव्हें का हें!"
म्हणुन आशेनें तो समोर पाहे,
सदन विद्येचें देखतां पुढारी
म्हणे " येथें मिळवीन ज्ञान भारी"

"इथें येइल मज शिकायास छान"
म्हणुन निर्धन तो वळतसे अजाण
परी दाराशीं हटकलेंच त्याला–
"कोण? येथें तूं कशासाठिं आला?"

"निरक्षर मी! मज हवे शिकायाला?"
"त्यास पैसा देशील खर्चण्याला ?"
"कुठे पैसा! कवडीहि नसे गाठीं!"
"नीघ मूर्खा, नच ज्ञान तुझ्यासाठीं!"

फिरुन माघारा करी वाटचाल
दिसें रुग्णालय, केवढें विशाल !
म्हणे दुखण्यानें गांजलोंच फार
"इथें होइल मज औषधोपचार"

कण्हत आला तो उंबऱ्यांत, तैसा
प्रश्न त्याला पहिलाच होय–"पैसा?"
"नाहि पैसा–पण रोग बघा माझा"
"हत् भिकाऱ्या! जा, मर खुशाल, जा जा!"

"अहो निर्धन मी म्हणुन मरूं काय ?
काय गरिबाला हाच जगीं न्याय ?
मला सांगा तर न्याय मिळे कोठे ? "
तोंच न्यायालय दिसे त्यास मोठें

पायरीशीं येतांच हो सवाल–
"काढ पैसा ! देशील किती ? बोल"
"दरिद्री मी तर देउं कुठुन काय?
परी पैशाविण अडे कसा न्याय ?:'

"न्याय देइल तुज फुकट तुझा बाप!"
देइ ठोकर-"चल जाव! बेवकूफ!"
हन्त न्यायालय कुठें गरीबाला ?
कुठें रुग्णालय? कुठें पाठशाळा ?

असुन सदनें लोकार्थ कितिक शाला
नसे एकहि कां सदन गरीबाला ?
"होय, गरिबाला सदन एक आहे!"
"अहो, तेथें न्या मला!" म्हणुन बाहे

"चलो!" म्हणुनी मग त्यास धरुन हात
पोलिसानें डांबला पिंजऱ्यांत!

इन्दूर, ३० नोवेम्बर १९५२

बर्फ तिमिरमय

बर्फ तिमिरमय हळुं हळुं आतां वितळूं लागे
शून्यामधुनी अद्‌भुतमय हो कांहीं जागें

भयाणावरी सुन्दरता धरते आकार
नवसृष्टीचा उजाडला हा प्रणवोद्‌गार

नीरवतेच्या ओठीं रमतो गीताचा रव
स्वप्नपाकळीवर सत्याचें स्थिरावतें दंव

अनन्तांत विस्कळले होते तेजाचे कण
एकच स्फूर्तित त्यांची झाली अनन्य गुम्फण

पिळतां आतां घट्ट धुक्याचा थबथबीत थर
कळलें पुरतें पैलाचें जें प्रेमळ अन्तर

अस्फुटांतलें उकलित उत्कट तरुणमनोगत
भवितव्यावर खोदित अपुला प्रकाशमयपथ

धूळीवरतीं शिम्पत मङ्‌गल जीवरसायन
उगवतीवरी टाकी पद 'मानव-नारायण'

इन्दूर, १२ डिसेम्बर १९५२

हि म अ ङ्गा र

अवचित आल्या गारा
खडखडला रव खिडक्यांवरतीं आणिक दारांदारां

हिमगोटयांची करीत गुम्फण
शिशिराची जणुं फिरते गोफण
जागविण्याला अरध्या रात्रीं निद्रावश संसारा

हिरीरींत हिमउल्का तुटती
कीं बर्फाचे तीरच सुटती ?
चाखुन त्यांचा चेव तिखटसा चढला खारा वारा

अजून दबले सत्याचे वच
अजून समता केवळ स्वप्नच
मानवतेचा सुंदर उडतो केवळ शब्दफवारा

भव्य कागदावर अभिव्यक्ती
मात्र कृतीला अडवी व्यक्ती
काण्डाकाण्डांतून चोरटा फुटतो लोभधुमारा

उद्धाराया ये परमात्मा
पण त्यालाही चुकवी आत्मा
हेवेदावे जुनेच छपुनी मनांत धरिती थारा

सम्पलीच आतां जलभाषा
रुद्ध राहिल्या ज्या आकांक्षा
त्यांचा झाला गोठुन फत्तर हाणाया अन्धारा

जरि अजस्र ठाके तिमिरासुर
जरि गारांची द्युती अणूभर
तरी तयांच्या अणूंअणूंतिल त्वेष करी निर्धारा

पहा नेम हा अचूक पडला
कांच दिव्याचा क्षणांत तडला
खाम्ब विजेचा कलथा होउन तुटल्या विद्युत् तारा

खडखड खडखड, कडकड कडकड
खडबडलें जग, झाली गडबड
नकळे कोठुन कुणी अचानक वर्षविला हा मारा

क्षणभर गारा वर्षुन गेल्या
क्षण तिमिरा सङ्घर्षत ठेल्या
अन्धाराशीं झगडत मेल्या पसरुन हिमअङ्गारा

इन्दूर, १० जानेवारी १९५३

आहा! ताजमहाल!

आहा ! ताजमहाल! पाहुन तुला हर्षें न जो नाचतो
ऐसा कोण असेल या जगिं? अगा शिल्पोत्तमा, जो तव
कर्पूरेन्दुतुषारधौत बघुनी हें आगळें वैभव
नाहीं मोहियला-खरोखर 'स वै मुक्तोऽथवा' कोण तो?

तूझे उन्च मिनार नी घुमट हे न्हायास ज्योत्स्नारसें
चन्द्रानें अपुली खुशाल सगळी वाहावली सम्पदा
कालिन्दीहृदयीं उठे सुखमयी उर्मी कशी गद्‌गदा
हें तूझें हिमगौर बिम्ब तिचिया ऐन्यांत जेव्हां ठसे

त्वद्रूपें मृदु कल्पनाच कविची आकारली का निकी ?
हें कौशल्य करील थक्कचि खरें धात्यास सृष्टीचिया
रामण्यान्चितविस्मयस्तिमित हो जो तोच पाहोनिया
मीही थक्कच होय-रे मज गमे आश्चर्य मोठेंच कीं-

हें निर्जीव खुशाल एक थडगें राहे महालामधें
लाखों जीव जिवन्त हिण्डति घरावाचून हालामधें !

इन्दूर, ६ मे १९५३

श्रमकळी

कामिनी कामाला सरली
हातीं तल्लख कोर विळ्याची
गालावर छबि उल्लासाची
गोड उमेदींत उघडे प्राची
उतावीळ भरली

वाऱ्यावर पदराचा शेव
म्हराट नेसण ही चोपीव
शेतावरतीं फुटलें पेंव
वहाण करकरली

तयार नाहित अजुन सोबतिणि
परी झटकली ही वनहरिणी
अतां न घालिल हिला मोहिनी
श्रीहरिची मुरली

उभारल्या टवटवित हिर्वळी
वनलताच ही त्यांत दर्वळी
उत्साहाची मधुर श्रम-कळी
वनांत संचरली

शेत हिच्यास्तव बसलें आतुर
अधीर झाले हरित तृणाङ्कुर
कळे हिला का कीं हिजखातर
मी तृणता धरली?

माळांतुन वळणावळणांतुन
कुरणांतुन शेतांशेतांतुन
हिरव्याहिरव्यागार वनांतुन
निळ्यामधें नुरली

बेतिया, २८ जून १९५३

काळ्या झाल्या क्षितिजकडा

आषाढांतिल सन्ध्या सुन्दर
दाट पिकांनी भरला परिसर
बाजूनें आला गिरिकन्धर
बाहु पसरि जणुं सातपुडा

आभाळीं भरली घनकान्ती
सुवासली ओलेती माती
निळ्यासावळ्या अशा दिनान्तीं
पहा कुठें जलपूर्ण घडा

घट किन्चित् कटिबांकिं उचलला
ठिबकुन जळ हो नितम्ब ओला
गांवकरणिचा भावहि भोळा
कोण अशी ही उभि प्रमदा ?

सान्जवला अन्धार सभोंती
रिमझिमत्या हिरव्या एकान्तीं
मैतरिणीला सांगत गोष्टी
करी आपला दिल उघडा

अधरोठांवर अङ्गुलि ठेउनि
बघति परस्पर खुदुखुदु हांसुनि
मधेंच कां ही बघे उसासुनि ?
कळे कुणा तें गुपित कडा ?

गुपित तिचें वाऱ्यास विचारा
लक्षुनि ऐके एकच तारा
उभा कसा टवकारुन चारा
कान फुटति का या दगडा ?

उभ्याच दोघी केव्हांपासुन
परन्तु गोष्टी सरल्या अजुनि न
उघडित असतां हळु आंतिल मन
हळुं पदरहि उघडे अरधा

पावसाळि हें भरे सरोवर
मानस भरलें तयाबरोबर
गोष्ट हिची चालणार तोंवर–
जोंवर हा वाहील झरा !

बडवाणी, २० जुलै १९५३

जिथें वाहिली एकदां प्रेमगङ्गा

जिथें वाहिली एकदां प्रेमगङ्गा
नदीमार्ग तो होय आतां रिता
तिथें फक्त विस्तार या फत्तरांचा
नि वैराण वैराण हें भोवतां

कुठें वीचि त्या नाचऱ्या हासऱ्या नी
कुठें फेनरेखा हिमाच्यापरी ?
झुलाव्यात ज्या भूवरीं स्वैरशा त्या
कुठें माधुरीच्या सरीच्या सरी ?

कुठें मञ्जु लालित्य तें मन्दगामी
जलश्री कुठें नेत्रसौख्यावहा ?
कुठें ती महोदारता अन्तरीची
कुठें भावही पारदर्शी अहा ?

तरङ्गावरी जी झुले नी डुले ती
अतां मोडुनी दूर नौका पडे
दिसे बाजुला एकलें नाविकाचें
परित्यक्त ओसाड हें झोपडें

जळावाचुनी वृक्ष हा रुक्ष झाला
अहा खोड त्याचा अतां वाळला
फुका पैलतां कां कमानी करोनी
निरुद्देशसा पूल हा टाकला ?

तृषार्ताचिया शुष्क ओठापरी हा
पडोनी दरा छिन्न झाला तट
भरे एकदां पूर्ण जो अमृतानें
पडे भङ्गुनी तो बिचारा घट

चहूंबाजुनें घेरते शून्यता ही
दिसे चौकडे कोरडी आर्तता
अशा, पोळत्या वाळवण्टामधें या
जराही कुठें दृष्टि टेकूं अतां ?

जळाची दया पांघरी कोण आतां
अहो, या खुल्या गारगोट्यांवरी ?
रिकाम्या नदीलागिं द्यायास पूर्ती
उभें राहिलें तोय नेत्रान्तरीं

कधीं अमृताचे वहातील हो पाट
या कोरड्या अन्तराळामधीं ?
अहा, हर्षकल्लोलिनी आमुची ती
भरे भावसिन्धू कधीं हो कधीं ?

बडवाणी–सेन्धवा–मार्ग
५ आगस्ट १९५३

चिखल म्हणाला

चिखल म्हणाला कमळालागीं
खालीं पडलों मी हतभागी
परी तुला उचलिन वरभागीं
चढ रे! चढ वर सुन्दरतेची कळी कळी खुलवी

झुळझुळ जळ बोले बाष्पातें
गड्या, सदा मी खालिं वहातें
परि हवेंत तुज चढविन वरतें
वर जा! वर जा! आभाळीं तव रङ्ग नवे भरवी

सजवुनिया गगनोत्सुक बाण
धनुष म्हणे मी साहिन ताण
परी भेटविन तुज अस्मान
सर सर बाणा! सप्तमस्वर्गीं जाइ गड्या, चढुनी

मनुज म्हणे मनुजाला काय?
मी तर खालीं गोते खाय
आणि तुझाही ओढिन पाय!
चढशिल तूं तर खेचुनिया तुज पाडिन मी खालीं!

बडवाणी, आक्टोबर १९५३

देइ तुझें प्रेम

देइ तुझें प्रेम मला व्योमसारिके !
हळुच दुरुनि तूं मजवर
तेजतलख टाकिसि शर
मोहानें गुन्तविसी नेत्र सारखे

झिरझिरीत धुन्दिलता–
–वसनाङ्कित तूं ललिता
किरणांचे छुमुक छुमुक नुपुर लाडिके

तूं वरतीं, तम अरतीं
मज खालीं धरि धरती
तरि अपुली जडलि रती चित्तहारके

अन्धारीं तूं हंसली
चमक तुझी मज दिसली
मज माझें भान गडे होय पारखें

नलगे गे मुळि प्रकाश
सूर्यचन्द्र हे कशास ?
तिमिरांतच भेट मला प्रेमतारके !

सेन्धवा, १७ जानेवारी १९५४

मला सोडा–मला सोडा

मला सोडा–मला सोडा !
कसा बन्धनांत राहूं ?
खुल्या वाऱ्याचा पिपासू
कसें कोण्डलेलें खाऊं ?

बन्दिवान राहायला
कसा – कसा होऊं राजी?
पिन्जऱ्यांत नान्दणारी
जात नव्हे नव्हे माझी !

मला सोडा–मला सोडा
कसा होणार मी वश ?
रुसेल ना नागकन्या ?
फणा हापटील शेष

माझ्या फणेवर आहे
स्वातन्त्र्याचा तेजोमणी
त्याला बन्धन पडतां
जाय झिजोनी विझोनी

उच्छृंखळ सुटेपण
माझ्या कण्यांत कण्यांत
वृत्ति नाचरी नाचरी
माझ्या कणांत कणांत

माझ्या नितळ तनूचा
आहे केतकीचा झोक
चन्दनाच्या बनोबनीं
माझा अधीरला रोख

माझी बाकदार चाल
आहे रानाच्या झऱ्याची
माझी स्वच्छन्दी लहर
आहे सैराट वाऱ्याची

माझा गहिरा सुरङ्ग
त्याला सङ्गीताची धुन्द
माझ्या कुरळ्या कुरळ्या
आवडीचा मुक्तच्छन्द

माझें झरकन् रिघणें
आहे तुटत्या ताऱ्याचें
माझें सरकन निघणें
आहे चपळ पाऱ्याचें

माझी सरारी तीराची
तिला पाताळाचीं टोकें
माझी वाट उजळती
लक्ष हीरकमाणकें

माझा वेढता विळखा
घट्ट प्रेमाची पकड
माझ्या जहरी निशेला
पाठ तारुण्याचा चढ

माझा बासरीचा श्वास
माझी गरुडाशीं झुन्ज
माझ्या रागीट फूत्कारीं
उभें ठिणग्यांचें कुन्ज !

दर्प हिरव्या चाफ्याचा
माझ्या उभार फणेंत
तिच्या उगारीं राहती
खड्ग गदा समवेत

माझें विजेचें स्फुरण
माझी प्रकाशाची उडी
मला सोडा–मला सोडा
माझी तुफान तातडी

मला सोडा–मला सोडा
जीव कोण्डला अन्तरीं
मला सोडा–मला सोडा
प्राण सोडीन ना तरी !

बडवाणी, १९५४

शि ख र

एव्हेरेस्टावर चढल्यावरती
काय तेनसिंगा तूं केलें?
स्वर्गाला चिकटविलें बोट?
की चन्द्राला हात लावला?
धरले नक्षत्रांचे लोलक–
गोंजारित का आकाशाला?
आकाशापरि ध्येय आमचें!
पाहत वरती किती रहावें?
पाहपाहुनी वरि मानेचा
मणका लागे मात्र दुखाया!

आकाशांतिल सुंदर तारे
राहायाचे आकाशांत,
खालीं येतो नुसता फत्तर!
नरांमधिल जो नारायण
तो सूर्याइतका राहे दूर

हिमशिखरावर गेल्यावरती
काय तेनसिंगा तुज दिसलें?
तुला भेटल्या
दिव्य अप्सरा?
की अवचित अंशुक फिटलेल्या
किन्नरनारी लाजुन लपल्या–
जरा ढगाच्या पडद्यामागें?

हिमशिखराहुन पाहत असतां
असेल दिसलें
शुभ्र फाकलें

भुवनाचें सौन्दर्यच सगळें
विश्वाचें रामण्य हिमानी
एव्हरेस्टाहुन
दिसली का रे
निष्कलंक पृथ्वी?
की दिसले
पृथ्वीवरलें डाग विषादी ?
डाग विनाशी–
लाल नि काळे–
रक्ताचे अन् राखेचेही ?
अफाट अंतर लंघुनि बघतां
तुला उद्याच्या दारापाशीं
दिसला कोणी का
विश्वात्मा
उभा असे जो
सृजावयाला स्वतःस
चुकल्या मानवतेस्तव ?

एव्हरेस्टाच्या टोकावरती
तुला तेनसिंगा चढलेला पाहुन
हिमनग हसला का रे,
कीं रुसला ? कीं नुसता बसला !

मनोरथाच्या मनोऱ्यावरी
कल्पकतेचा कुतुबमिनार चढऊनि
त्याच्यावरती चढुनी
तुला तेनसिंगा पाहूं दे !

अचल हिमाचल बसला होता
डोक्यावरती बर्फ ठेउनी

थंडगारशा तन्द्रीमध्यें

डोक्यावर कांहीं खाजवलें
त्यास वाटलें
शंकरजीचा ढवळा नंदी
बर्फ खुरानें असेल खोदत,
पण चाचपडुन बघतां–
हें हो काय सापडे ?
काय असे तरि ?
काय असे हो ?
आणि तेनसिंगाला ठेउन तळहातावर
निरखित त्याला
हिमनग मोठ्या कुतूहलाने म्हणे तेनसिंगाला तें–
जें पिग्मीला अन्टियस् म्हणाला–
" अरे कोण तूं ? "
" तेनसिंग मी – होय – शेरपा तेनसिंग मी ! "
" तेनसिंग मज समजत नाहीं, कुठला प्राणी ? "
" प्राणी ? म्हणजे ?–
पुरता साडेपांच फुटांचा
माणुस ना मी ! "

" माणुस ? छे छे–
माणुस येथें कोठुन यावा ?
इथें माणसें येतच नाहित
भल्या माणसा,
काय हवें तुज ? "
" कांहि नको रे
–फक्त–

अेकदां डोक्यावरती तुझ्या
बसूं दे ! "
तेनसिंग अुतरला चटपट

लिलीपुटी ती लटपट पाहुन
हिमाचलाला आलें हासूं !
" गोठशील ना तूं बर्फाने ? "

" करिल काय तें बर्फ बिचारें ?
बर्फापेक्षां बर्फ–
आमचीं हृदयें झालेलीं आहेत!
बर्फाला गोठवील
–मानव ! "

" येथुन जर तूं पडला खालीं
अेकुणतीस हजार फुटांशीं ? "

" अेकुणतीस हजार फुटांचा–
धाक काय हो मला घालतां ?
यापेक्षांही दसपट, शतपट
घसरलोंच कीं नाहीं आम्ही
अुपनिषदांहुन अपरथिडांत ? "
" तुज मरणाची भीती नाहीं ?"
" भीती ? छे छे–
अुलट, अम्हाला मरणाची तर फारच हौस !
मरणाची मुळि वाट न बघतां
आम्हाला आम्हीच मारतों ! "
अशीं अुत्तरें अैकुन क्षणभर
हिमाचलाला तसें वाटलें–

राक्षसास की जसें वाटलें होतें-
अैकुन जॅकचें अुत्तर !

पुसे हिमालय-
"बुद्ध कुठें मग? खिरस्त कुठे तो?"
" भले ! हिमाद्रे ! मला वाटतां तुम्ही खरोखर
रिप् व्हॅन् विंकल्! रिप् व्हॅन् विंकल्!
बुद्धाला तर होअुन गेलीं
दोन हजारांवरती वर्षे !
खिरस्तालाही झालीं आता वर्षें
अेकोणीसशेत्रेपन,
त्यावर गांधी होअुन गेले !"

जरा लाजला, गोंधळलाही
परी हिमाचल पुढे विचारी-
"कोठे माझ्या गुहेंतील तें धर्मतत्त्व ?"
" आहां भ्रांतींत ! गुहेमधें नाहींच तत्त्व
तें आहे प्रयोगशाळेमध्यें
त्यास तपासत आहों आम्ही
बिकिनी अन् अेनिवेतोक्मधें ! "

"धर्मतत्त्व तर फार पुरातन-"
"जीर्ण तत्त्व तें विसरा आतां,
घ्याच जाणुनी तत्त्व नविनतम-
'लिथियम्' आणि 'ड्युटेरियम्' हें
या लिथियम् सिक्स ड्युटेरैडनें
तुला हिमाद्रे अुखडूं आम्ही ! "

सारी बडबड अैकत होता

नङ्गा पर्वत अितका वेळ,
आतां त्याला राहावेना
डोळे मिचकावीत म्हणाला–
“ पुरे मुंगळ्या ! दिसते कंबर !”
हसूं लागला खदाखदा तो !
दृढ स्वरानें तेर्नासिग पण
छाती काढुन उलट म्हणाला
“मला मुंगळा तुम्ही समजतां ?
तुम्हाला वाटतेच का ही थट्टा ?
माझ्याकडे पहा तर ”

तेर्नासिग मग उभा राहिला
पवित्र्यामधें

चमत्कार !
तो भराभर मोठा होऊं लागला !
भार तयाचा असह्य होउन
हिमाचलाचा कन्धर नमला !
विराट दिसलें हिमाचलाला
यशोदेस जें दिसलें होतें
जें बळिवक्षावरती होतें पाय रोउनी उभें राहिलें
–तेंच नभीं प्रतिबिंबित झालें
धूसर अभ्रा सारुन आलें
उन्नतमस्तक ठाकें पुढतीं

विशाल मानव !
हाच उद्याचा मानव !
कांहीं घेऊन आला प्रेमोपायन

विज्ञानाचें मन्थन करुनी
काढियलें जें अद्भुत लेणें–
मत्स्याकार,
कवच त्यावरी–
कोबाल्टाचें !
म्हणे जगाला "समर्पयामि"
जगहि म्हणालें "प्रतिगृह्णामि"
तों ऐन्स्टीन् किंचाळत उठला–
" सावध ! सावध !"

क्षणार्धांत पण
शत प्रलयांच्या मेघगर्जना
एकवटुन रव भैरव झाला !
ऐकुन बसल्या–
आकाशाच्या कानठळ्या !
मग तेजोलोळ एक उचलला
लक्ष विजांची एकच ज्योत–एकच स्रोत !
नग्न नागडी पाहुन आभा
ब्रम्हाण्डाचा दिपला गाभा

ज्वलन्त जालिम हवा चेतली !
जाळत सुटली–
पोळत सुटली–
सजीवतेचा थांगहि पुसला !
ओडेसा ते लेनिनग्राड
यूरालाहुन प्राग्पर्यंत
आध्रुव दक्षिणही
पृथ्वीवर पडले उघडे–

हजार मैल रुंदीचे राखेचे पट्टे !

दाट ढगाळुन अणुकण आले
जिकडे तिकडे जगभर भरले
वस्तुवस्तुवर चिकटुन बसले
बसले तेथें टिपलें जीवन
पडले तेथें पडले व्रणव्रण
शिवतां गळतीं गात्रें लिंगें
स्पर्शें तडकुन गेलीं भिंगें !

सौन्दर्याची कळा निपटली
स्वाद मधूचा बेचव झाला
सुगन्धातला वासहि विझला
रङ्गाचेंही मुख हिरमुसलें
हास्यामागें उरलीं हाडें
चैतन्यावर जडता निजली
रक्तवाहिन्या नीरस बनल्या
आणि त्वचेचा उरला कागद
स्नायूंतिल पिरगळला जोर
हिमालयाचें झालें मेण !
गर्गर आली घेरी त्याला

परन्तु भासच !
हिमालयानें
डोळे उघडुन नीट पाहिलें
—एव्रेस्टाचा गाल खाजवित
तोच 'मुङ्गळा' हासत होता!

बडवाणी, २५ एप्रिल १९५४

हा हि मा न व आ हे

पुढारलेल्या मानवा !
अजून लंगोटी लाऊन फिरणारा
हाहि मानव आहे

वाफेनें नवसृष्टि घडणाऱ्या मानवा !
क्षणाक्षणाला–
हरकामाला–
विजेचें बटण दाबणाऱ्या मानवा !
ज्यानें फक्त
ढगांतली वाफ
अन् ढगांतच बिजली पाहिली असा
हाहि मानव आहे

अणुवेगानें धावणाऱ्या मानवा !
परमाणूंसा
धुळींत हळू पावलें टाकणारा
हाहि मानव आहे

रेडिओनें
अवकाश भरणाऱ्या मानवा !
सावकाश पाव्यांत हवा भरणारा
हाहि मानव आहे

अनादि भूत
नी अनन्त भविष्य

जाणणाऱ्या मानवा !
फक्त सध्याची घटका जाणणारा
हाहि मानव आहे

उत्क्रान्तिचा उच्चस्तराच्या
अतिमानवा !
तळथराला
गोरिलासारखा
हाहि मानव आहे

प्रकाशवर्षे मोजणाऱ्या मानवा !
अन्धारवर्षांचें गणित कर
तेथें हा मानव आहे

तुझ्या प्रगत जगांत
नसूं दे त्याला जागा
देवाच्या अफाट दुनियेंत
त्याला जागा आहे

बडवाणी, १९५४

वा रा

आला ओढीत ओढीत वारा
तुझ्या पदरानं सोडला थारा ग

नाच भरून बिथरल्या लाटा
लाल मुरुमावर मोडल्या वाटा
झोके खाई गोईचा किनारा ग

पाण्ढऱ्या चाफ्यानं टाकली चूळ
कर्वन्दकाट्यावर फिरली भूल
हिरव्या बोरींच्या लागल्या हारा ग

नितळ तनू तकाके काळी
लाल चुटुक् ओढणी ल्याली
निळ्या भाळावर गोंदल्या तारा ग

अन्जनपाल्याचा डोईवर भार
गळां गळ्सर रुळे भरदार
सातपुड्याचीं टोकं टोकं बारा ग

श्रावण फैलावला जरतारी
कां ग थबकली तूं भिल्लनारी?
तुटल्या कड्यावर बिजलीधारा ग

सातां रङ्गाचे झङ्कार झाले
तुझ्या नजरेंतून सारङ्ग हाले
काळ्या ढगाचा ठिबकला पारा ग

ओल्या खडकाच्या फुटल्या पाळी
झुके गर्वाचं आभाळ खालीं
तुझ्या पायांशीं दबला चारा ग!

बडवाणी, १२ जून १९५४

व र स रे मे घा—

वरस रे मेघा !

वरस, वरस

भिजव रे त्यांना
नाहीं जे भिजले
भिजल्या जगांत
भिजल्या रंगांत
नाहीं ठिबकले
घुसव कोरड्या
फत्‌रांत गिलावा
फत्‌राच्या मांसाला
शिकव ओलावा

वरस रे मेघा !

वरस, वरस

भर रे भर
नाहीं जे भरले
भरल्या गंगेंत
उपडे वाहिले
रिकामे राहिले
तयां अभाग्यांना
घडव एकदां
पूर्णाचा स्पर्श
संपूर्ण हर्ष

वरस रे मेघा !
वरस, वरस
    आडव रे त्यांना
    जे का अनिरोध
    ज्यांना नाहीं केला
    कोणीच विरोध
    आडव त्यांना
    प्रवाही हातांनी
    पूराच्या दण्डानें
    आडव त्यांचा रस्ता
    आडव राजरस्ता !

वरस रे मेघा !
वरस, वरस
    सोड रे सोड
    उतावीळ ओघाला
    फोफावत रिघूं दे
    खेचत्या वेगाला
    धावत्या धारेला–
    धावऱ्या इच्छेला–
    मोकल रे मोकल
    मोकळें क्षितिज !

वरस रे मेघा !
वरस, वरस
    धक्क्यानें ढकल
    अगतिक माती
    पुढतीं–पुढतीं–

चालव चालव
पाङ्गळी मृत्तिका !

वरस रे मेघा !
वरस, वरस

उठव रे त्यांना
सदा जे चेन्दले
सदाहि ठेचले
सदा तुडवले
तरीहि तगले
हिरवे उगले
जगले ! जगले !

बसव त्यांना
डोंगराच्या माथीं
करी आरूढ
प्रासादमस्तकीं
गर्विष्ट खडकाच्या
छातीवरतीं
मिरव रे त्यांना
नाचव रे त्यांना
नाचूं दे ! नाचूं दे !
नाचूं दे ! नाचूं दे !!

माझ्या मनमेघा !
असा वरस

देवास, १९ सप्टेंबर १९५४

केव्हां केव्हां

केव्हां केव्हां मनांत येतें
कीं हा रस्ता डाम्बरलेला
सभ्य गुळगुळित प्रशस्त सोडुन
जरा आडवाटेंत शिरावें
ज्या गांवाला जाणें नाहीं
त्या गावाची वाट पुशीत
उनाड जङ्गल तुडवित जावें
जेथें सहसा कुणी न जाई
खार कुडुमुडू बदाम खाई
ससा उभा टवकारुन कान
सरडा बसला फिरवित रङ्ग
कर्वन्दीच्या काळिजामधें
घस्स् वाजतां कांहीं भीती
टळल्या अशुभापरि पानांतुन
घुबड निसटतें उडून जाई

रसरशीतशा नरम दुपारीं
मेस्कालिन्ची किमया करुनी
बाल्याची दृष्टी आणावी
आणी नजरेमधें भरावी
रङ्गांची उत्तानज्वाला
उघड्या पायांखालीं दाबत
गोट्यांचें खडबडित जवाहिर
ओढ्याचें शेंपुट पकडावें
गवताच्या विन्चरींत झिपऱ्या
काट्यांचे रोंवित रोमान्च

तीक्ष्ण नखांनी खोल रुपावीं
वनबोरींचीं फुटीर बोरें
तङ्ग पेरुच्या गेन्दांवरतीं
खोदावे आसक्तीचे व्रण
हळुंच मारुनी खडा जळाच्या
गालीं स्मितवर्तुळ खुलवावें
सावध चवड्यानें मुरुमाचा
इङ्गित कांहीं ठिसूळ संशय
खोल उतरणीतुन उतरावें

लपाछपीची वाट वाकडी
हवी जरा वळणाची गूढ
धोक्याची पण तशीच अद्‌भुत
खेचक, आकर्षक, ओढाळ
कसल्यातरि शिरशिरिची गोड
कांहीं अतिरेकी हर्षाची

केव्हां केव्हां चाखायाला
तुरट कडूसर आम्बट मौज
रस्त्याच्या काठास असावे
कच्चे पेरू, कच्चीं बोरें.

इन्दूर–कन्नोद मार्ग
१३ डिसेम्बर १९५४

मु क्ता

गड्या जन्मभर तूं केलास विचार
परि तव हातीं निःसारच ये फोल
कारण मूर्खा, सारचि जें बिनमोल
त्यास तर हवा क्षणभरींच अविचार

*

सारखाच मी करीत आहे शोध
शोधुं कुठें तें? कुठें हरपलें? हाय!
आणि खरोखर शोधतसे मी काय
त्याचाही धड नाहीं मजला बोध

*

कळिस दिलें तूं पूर्तीचें कैवल्य
स्वत् स्पर्शाची वोपुनि तिजला स्फूर्ती
तूंच रविकरा आतां चढल्यावरतीं
त्याच फुलाचें करिसी कां निर्माल्य?

*

त्या ऐन्यानें तुजसमोर क्षण एक
झळकविली तव मधुरमुखप्रतिमा गे
मात्र धुळीनें जपुन ठेवले मागें
तूं गेल्यावर तव चरणांचे अङ्क!

*

पिळुन चान्दणें घडली तव तनु गोरी
नयन निर्मिले पिळुन हिरे नवकोट
माणिक पिळुनी तुझे बनविले ओठ
पिळुन मनें गे बने हर्ष तव पोरी

हिमरजनीचा सारीपट नभिं घाले
कीं बसला हो लेखक कोणि निनांव
पसरुन आभाळाचा कोरा ताव
करीतसे जो पाण्ढऱ्यावरी काळें ?

*

हे धरतीचे झरते हृदयउमाळे
कुठुन बरें हे वाहत येथें आले ?
कुठुनतरी हे असेच वाहत आले
वाहत वाहत तीर्थ जगाचें झाले !

*

रसज्ञ भ्रमरा, मम मधुरस तुज ठावा
मम सुरङ्ग नी सुगन्ध तुजला व्हावा
तुज रसिका रे कोठुन कीट दिसावा?
मज पोखरुनी आंत घेइ जो चावा

*

क्षणैक वीक्षण! क्षणैक नेत्रलकाकी!
क्षणैक मीलन! क्षणैक भीति उगीच!
क्षण-काय बरें?-कांहींच्याबाहींच !
तें क्षणिक सरे-उरे चिरन्तन बाकी !

*

ही रोड उन्च लवरी खजुरी बघून
कान्ता वियोगविधुरा मज ये स्मरून
जीचें तुळे कृश शरीर नवेन्दुरेषें
निस्तैल सैल कच विस्कटती भुरेसे

*

जुळविलीच त्यानें कविता कांहीं नवी
ते कवित्व मग तो पत्नीला दाखवी
"समजलिस् काय तूं? साधा का मी कवी?"
ती निर्विकार चेहरा करुन बोलली–
"राहूं द्या कणिका ! कणीक आधीं हवी–"

आवश्यक टिपा

(आकडे पानांचे समजावेत)

३	अन्नासाठीं	बंगालांतील भयङ्कर दुष्काळांत घडलेल्या सत्यकथेवर ही कविता आधारलेली आहे.
६	स्मिताची लाघवी छाया	प्रच्छन्न प्रतिस्पर्ध्यास उद्देशून ही कविता लिहिलेली आहे.
१२	प्रतीती	१९४२ तील क्रान्तीतील एका वीरास उद्देशून हे उद्गार आहेत.
३४	'शब्दविषय'	आकाश
३७	त्यांनी केली चळवळ	ही अपूर्व चळवळ १९८५ त इन्दुरास झाली होती
४७	पैल डगांच्या	हे उद्गार रेडिओस उद्देशून आहेत.
४८	जुन्या पुराण्यांचा	१९४८ तील विलीनीकरणाचा येथें अभिप्राय आहे.
५४	'अनास'	एका नदीचें नांव
६१	उदयघडीची तोफ्	ग्वाल्हेरास सूर्योदयसमयीं तोफ डागण्यांत येत असे.
६९	जीवनदाता	बिहारांतील जळप्रळयावरून ही कल्पना सुचली.
७१	या इथें	ग्वाल्हेरच्या प्रथमदर्शनीं हे विचार आले.
७३	'प्रांशुलभ्य पण'	प्रांशुलभ्ये फले मोहादुद्बाहुरिव वामनः । रघु. १।३

७४	**हा सौन्दर्यकले**	ग्वाल्हेर किल्ल्यांतील पुरातन पाषाण-शिल्पावशेषांपैकीं एका भग्न स्त्रीमूर्तीस उद्देशून हे उद्‌गार आहेत.
७४	**'वङ्किम'**	बांकदार
८३	**हिमअङ्गार**	एकदां मध्यरात्रीस गारांचा वर्षाव झाला. त्यावरून ही कल्पना सुचली.
९३	**मला सोडा मला सोडा**	म्हैसूरच्या चामराजेन्द्र बागेंतील प्राणि-सङ्ग्रहालयासाठीं पकडून ठेवलेल्या एका सर्पानें स्वतःच्या मुक्ततेसाठीं अन्नत्याग आरम्भल्याचें वर्तमान प्रसिद्ध झालें होतें. इतर कोणत्याहि प्राण्यापेक्षां सर्प हा वश होऊन राहण्यास अधिक नाखुषी दाखवितो असें तज्ज्ञांचें मत आहे.
९६	**'कीं अवचित अंशुक फिटलेल्या'**	पहा कुमारसम्भव १।१४
९७	**'सृजावयाला स्वतःस'**	'तदात्मानं सृजाम्यहम् (गीता ४।७)
९८	**'पिग्मी'**	काल्पनिक बुटका माणूस
९८	**ॲन्टिअस्**	काल्पनिक महाराक्षस
९९	**लिलिपुट**	काल्पनिक बुटुकल्या माणसांचे बेट
९९	'Apartheid'	आफ्रिकेंतील काळागोरा असा भेदभाव
१००	**'जॅक्'**	गोष्टीतील राक्षसास मारणारा जॅक् नांवाचा मुलगा (Jack the giant Killer)

१०० **'रिप् व्हॅन विन्कल्'**	अनेक वर्षे झोपल्यावर जागा झालेला कथापुरुष.
१०० **'गुहेंतील ते धर्मतत्त्व.'**	' धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम् । '
१०० Bilini, Eniwetok	(प्रशान्त महासागर) येथें H-Bomb च्या स्फोटाचे प्रयोग करण्यांत आले.
१०० Lithium, Deuterium	हायड्रोजन बाम्ब तयार करण्याच्याकामीं लागणारीं मुख्य रसायन द्रव्यें
१०० Lithium six Deuterium	कोबाल्ट बाम्ब अस्तित्वांत आणणारें नवीन रासायनिक मिश्रण
१०२ **' कवच त्यावरी कोबाल्टाचें. '**	H-bomb वर Cobalt चढवितां आल्यानें त्याच्या विनाशक प्रभावांत फार मोठी क्रान्ती घडून आली आहे.
१०२ **' आइन्स्टीन् '**	प्रसिद्ध वैज्ञानिक
१०२ **'ज्वलन्त जालिम ' इ.**	H-bomb च्या स्फोटानें हवेंतील तापमान शेकडों लक्ष सेन्टिग्रेड चढेल असा वैज्ञानिकांचा तर्क आहे.
१०२ **'ओडेसा ते प्राग्पर्यन्त.'**	कोबाल्ट बाम्बच्या स्फोटानें सम्भवणाऱ्या अग्निप्रलयाविषयीं अनुमान.
१०३ **'बसेल तेथें टिपती जीवन.'**	कोबाल्ट बाम्बच्या स्फोटानन्तर वातावरणांत पसरणाऱ्या अणुकणांमुळें होणारा जीवननाश.
१०४ **हाहि मानव आहे**	आदिवासी मुलुखातील नग्नप्राय भिल्लास पाहून ही कल्पना सुचली.

१०५ 'प्रकाशवर्ष'	एक वर्षांत प्रकाश जेवढ्या अन्तरावर जाईल तेवढें दुर्मेय अन्तर.
१०६ गोई	एका नदीचें नाव
११० मेस्कालिन्	कॅलिफोर्निया आणि नेवॅडाकडे सापडणारी औषधिविशेष. याच्या सेवनानें दृष्टीस विलक्षण चेतना मिळून वस्तूंचे रङ्ग अत्यन्त गडद भासू लागतात.

